PDF Compressor Free Version

**JAYDEEP B. KULKARNI**
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR


महेंद्र पेडावाला
रजवाडी
गुजराती थाळी
दर रविवार - दालवाटी, चुरमा
(रेल्वे पार्सल सुविधा)
किटी पार्टी, बर्थ डे पार्टी
करिता ५० जणांची उत्तम व्यवस्था
कापड बाजार, कोहिनूर शेजारी, अ. नगर
(आमरस - ४००/- रु. किलो मिळेल)

Volume - 72 | Issue- 204 | Marathi Daily | Saturday 20/4/2024 | Pages - 8 | Price- Rs. 3

# लक्षवेधी निवडणुका



लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे सार्वत्रिक निवडणुका. भारताच्या १८ व्या लोकसभेसाठी कालपासून निवडणुका सुरू झाल्या. एकूण सात टप्प्यात होणाऱ्या या निवडणुकांची दिवसेंदिवस रणधुमाळी वाढत आहे. नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करताना भाजपा प्रणित आघाडीने जिथे 'चारशे पार' चे लक्ष्य ठेवले आहे, तिथे विरोधकांना मतदार यावेळी भाजपा आघाडीला नाकारेल असा ठाम विश्वास आहे. त्यात काही खाजगी दूरचित्र वाहिन्यांच्या सर्वेक्षणाचे अहवालदेखील प्रसिध्द होत आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत, सर्व सामान्यांपासून तर तज्ज्ञांपर्यंत आपापल्यापरिने निकालाचे अंदाज लावत आहेत. काही ठिकाणी लढती एकतर्फी वाटतात तर काही ठिकाणी धक्कादायक निकाल दरवेळेस लागत असतात. अशा वेळी सर्वांचेच अंदाज फोल ठरतात. अशाच आजवर झालेल्या काही लक्षवेधी निवडणुकांचा यानिमित्ताने आढावा घेत आहोत.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला आणि पंडित नेहरू यांच्या नेतृत्वाखाली देशाचे हंगामी सरकार स्थापन झाले. १५ जणांचे मंत्रिमंडळ असणाऱ्या या सरकारात सरदार वल्लभभाई पटेल हे उपपंतप्रधान आणि गृहमंत्री तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री होते. एकही विरोधी पक्ष नसलेले हे आजवरचे एकमेव सरकार. १९५० च्या सुमारास उद्योग आणि पुरवठा मंत्री असणाऱ्या श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी पंडित नेहरूंशी झालेल्या मतभेदांमुळे काँग्रेसमधून बाहेर पडून जनसंघ नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला. त्यापाठोपाठ काँग्रेसला सोडचिठ्ठी देत जे.बी.कृपलानी यांनी शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला. दरम्यान सप्टेंबर १९५१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील नेहरुंशी फारकत घेऊन शेड्युल कास्ट फेडरेशन नावाचा पक्ष स्थापन केला ज्याचे पुढे जाऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियामध्ये रुपांतर झाले. १९५० मध्येच भारताच्या निवडणूक आयोगाची स्थापना होऊन सुकुमार सेन यांची मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक


**विविध विशेष**
**ज्ञानेश कुलकर्णी**

झाली. राज्यघटना स्वीकारल्यापासून दोनच वर्षात म्हणजे १९५२ साली पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. एकाचवेळी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका घेण्यात आल्या. नुकतीच स्वातंत्र्य मिळून राज्यघटना तयार झाली असता देश एवढी मोठी लोकशाही निवडणूक प्रक्रिया कशी पार पाडू शकेल यावर तेव्हा जगाचे लक्ष लागून राहिले असेल. तरी सर्व शंका कुशंकावर मात करत सगळ्या मिळून एकूण ४५०० जागांच्या निवडणुका यशस्वी पार पडल्या. त्यापैकी लोकसभेच्या ४९९ जागा होत्या.

एकूण चार महिने चाललेल्या या निवडणूक प्रक्रियेची सुरुवात २५ ऑक्टोबर १९५१ रोजी मतपेटीत पहिले मत टाकून झाली, तर फेब्रुवारी १९५२ मध्ये संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाली. या निवडणुकीत सहभागी होणाऱ्या मुख्य पक्षांमध्ये पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील काँग्रेस, जयप्रकाश नारायण आणि डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या नेतृत्वाखालील समाजवादी पक्ष, श्यामा प्रसाद मुखर्जी यांचा भारतीय जनसंघ आणि कम्युनिस्ट पक्ष अशा एकूण १४ राष्ट्रीय पक्षांनी त्या वेळी निवडणुका लढवल्या होत्या आणि ४० स्थानिक पक्षही निवडणुकीत सहभागी झाले होते. त्यावेळी पं. नेहरूंच्या नेतृत्वाची मोठी लाट होती (२०१४ मधील नरेंद्र मोदींच्या लाटेसारखी). त्यांनी आणि लाल बहाद्दूर शास्त्री यांनी नऊ महिन्याच्या काळात पूर्ण देश पिंजून काढला होता. काँग्रेसने जो कोणी उमेदवार दिला तो प्रत्येकजण जवळपास निवडून आला. भारतीय जनतेने नेहरूंच्या नेतृत्वावर प्रचंड विश्वास दाखवत ३६४ जागांवर काँग्रेसला विजयी केले. त्याखालोखाल कम्युनिस्ट पक्षाने १६, समाजवादी पक्षाने १२, शेतकरी कामगार पक्षाने ९, जनसंघाला केवळ ३ तर डॉ.आंबेडकरांच्या पक्षाला २ जागा मिळाल्या. सर्वात आश्चर्य म्हणजे घटनेचे शिल्पकार, नेहरूंच्या मंत्रिमंडळात राहिलेले कायदा मंत्री आणि एकेकाळी सर्वात जास्त पदवी घेणारे लंडनस्थित भारतीय म्हणून ख्याती असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उत्तर मध्य मुंबई या राखीव मतदार संघातून पराभव स्वीकारावा लागला. **(पान २ वर)**

## उठाठेव
– विवेक मेहेत्रे



माझ्या मतदारसंघातील बहुतांश लोकांना कोणत्या चॅनेलवरील कोणत्या मालिका जास्त आवडतात ते शोधून सांगा... तेवढ्या वेळा टाळून प्रत्यक्ष प्रचारासाठी फिरणार आहे मी!

### दहा वर्षात तुम्ही काय केले? अमित शहांना प्रत्युत्तर

# आमचे लक्ष्य विधानसभा- शरद पवार

**समाचार/नगर-दि.२०**

विधानसभेत जास्तीत जास्त आमदार पाठवण्याचे आमचे लक्ष्य आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत दहा जागा लढण्याचा निर्णय आम्ही जाणिवपूर्वक घेतला आहे. राज्यातील एक–दोन जागांचा अपवाद सोडला तर सर्व ठिकाणी महाविकास आघाडीमध्ये एकवाक्यता आहे, असे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्पष्ट केले. मागील दहा वर्षे आम्ही सत्तेत नव्हतो. ते सत्तेत आहेत, त्यामुळे दहा वर्षात काय केले, हे सांगण्याची त्यांची जबाबदारी आहे, असे प्रत्युत्तर त्यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांना दिले.

नगर येथे आज सकाळी शरद पवार यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी नीलेश लंके, दादाभाऊ कळमकर, राजेंद्र फाळके, प्रताप ढाकणे, अभिषेक कळमकर आदी



उपस्थित होते. शरद पवार म्हणाले की, मी दहा वर्षे सत्तेत होतो. त्यावेळी शेती खात्याचा मंत्री असताना शेतीसाठी काय केले, हे सगळ्या जगाला माहिती आहे. त्यामुळे त्यांनी दहा वर्षाच्या सत्तेत त्यांनी काय केले, हे सांगण्याची त्यांची जबाबदारी आहे, असे प्रत्युत्तर त्यांनी अमित शहा यांच्या टीकेला दिले. तसेच अजित पवार यांच्यावरून **(पान ३ वर)**

### नरेंद्र मोदी यांची नांदेडमध्ये टीका

# इंडिया आघाडीचे नेते एकमेकांचे कपडे फाडतील



**नांदेड, दि. २०**–इंडिया आघाडीचे लोक आपला भ्रष्टाचार लपविण्यासाठी एकत्र आले आहेत. हे लोकांनाही समजत आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यातच मतदारांनी इंडिया आघाडीला नाकारले. देशातील २५ टक्के जागांवर इंडिया आघाडीचे पक्ष एकमेकांच्या विरोधात लढत आहेत. जे लोक स्वतःच्या आघाडीवर विश्वास ठेवत नाहीत, अशा लोकांवर देश विश्वास ठेवू शकतो का? जे लोक **(पान ३ वर)**

**Urgently Required**
Quality Supervisor - 3
(For Fabrication & Machining)
Draftsman - 1
Turner - 2
- Contact -
Mob. 9960996293

**विकणे आहे**
गुलमोहर रोड येथील रोड टच पहिल्या मजल्यावरील १000 स्के. फुटाची वेलफर्निश्ड ऑफिस स्पेस विकणे आहे.
-: संपर्क :-
9011923939

**नालंदा**
स्कूल आणि क्लास बेंचेस प्रायमरी, हायस्कूल आणि कॉलेजेससाठी उपयुक्त
- Strong, Sturdy & Beautiful
- Sleek & Attractive
- Powder Coated Frames
- Top & Seat Colour Choice
- Action Tessa
B. S. L. Tops
संपर्क 9822294670
9890985601

# गॅस रिफिलिंग सेंटरवर तोफखाना पोलिसांचा छापा

**समाचार/नगर-दि.२०**

घरगुती वापराच्या गॅस टाकीतून वाहनांमध्ये रिफिलिंग करून गॅस भरला जात असल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांनी छापा टाकत ३४ गॅस टाक्यासह गॅस रिफिलिंगचे साहित्य असा ६९ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. तोफखाना पोलिसांनी कोठला भागात एका टपरीच्या आडोशाला सुरू असलेल्या रिफिलिंग सेंटरवर ही कारवाई केली. याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्सार अली सय्यद (वय २०, रा. मुकुंदनगर) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. कोठला येथे टपरीच्या आडोशाला एक जण गॅस रिफिलिंग करत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांना मिळाली होती. त्यांनी गुन्हे शोध पथकाला छापा टाकून कारवाई करण्याचे आदेश दिले. पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता, घरगुती वापराच्या गॅस टाकीतून वाहनांमध्ये रिफिलिंग करून गॅस भरला जात असल्याचे दिसून आले. पोलिसांनी छाप्यादरम्यान ४० हजार रूपयांच्या २० सीलबंद गॅस टाक्या, १४ हजारांच्या खाली झालेल्या १४ गॅस टाक्या, **(पान ३ वर)**

## अजित पवार यांचा अर्ज नामंजूर

**बारामती, दि. २०**–बारामती लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाने सुप्रिया सुळे यांना उमेदवारी दिली आहे. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने सुनेत्रा पवार यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे या मतदारसंघात चुरशीची लढत होणार आहे. अर्ज भरताना सुनेत्रा पवार यांच्यासोबत अजित पवार यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला होता. अजित पवार यांनी डमी उमेदवारी अर्ज भरला होता. मात्र, अर्ज छाननीत अजित पवार यांचा अर्ज बाद झाला आहे. तर सुनेत्रा पवार यांचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. सुप्रिया सुळे यांचाही अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

# विकासासाठी खा. विखे यांना शहरातील जनतेने साथ द्यावी- अ‍ॅड. आगरकर

**समाचार/नगर-दि.२०**

नगर जिल्ह्याच्या विकासासाठी खा. सुजय विखे यांच्या सोबत नगर शहरातील जनतेने यावे, असे आवाहन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर यांनी केले. नगर शहरातील प्रचार सभेत अ‍ॅड. आगरकर बोलत होते. यावेळी खा. सुजय विखे, अनिल शिंदे, सचिन जाधव, दिलीप सातपुते, महेंद्र गंधे, सचिन पारखी, प्रशांत मुथा, महेश नामदे, उदय कारळे, करण कराळे, संपत नलावडे, बाळासाहेब गायकवाड, नितीन शेलार, प्रिया जानवे, सविता कोटा उपस्थित होते.



अ‍ॅड. आगरकर म्हणाले की, मागील १५ वर्षापासून प्रलंबित असलेला उड्डाणपूल खा. सुजय विखे यांनी मार्गी लावला आहे. त्यांच्याकडे नगर जिल्ह्याच्या विकासाचे उद्दिष्ट स्पष्ट असून त्यांच्या माध्यमातूनच जिल्हा विकसित होऊ शकतो, असा विश्वास त्यांनी केला. खा. विखे पाटील यांच्या प्रचारादरम्यान लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

अ‍ॅड.आगरकर पुढे म्हणाले की, विखे कुटुंबांची नाळ जिल्ह्याशी जोडली गेलेली आहे. मागील ५० वर्षाच्या काळात विखे कुटुंबांनी जिल्ह्याच्या विकासात भरीव योगदान दिले आहे. त्यामुळे त्यांच्या चौथ्या पिढीला लोकांची साथ मिळत आहे. देशात १० वर्षामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखविलेले विकसित भारताचे स्वप्न पुर्ण करायचे असेल तर खा. विखे यांना साथ दिली पाहिजे. मतदानाचा जो संविधानिक अधिकार मिळाला आहे, त्याचा योग्य वापर करावा आणि राष्ट्रहिताचा वापर करणाऱ्या सरकारच्या मागे उभे रहावे, असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. मागील पाच वर्षात जिल्ह्यात रस्त्यांचे जाळे उभे राहिले आहेत. तीन ठिकाणी एमआयडीसी होणार आहे. बचत गटांमार्फत महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. राष्ट्रीय वयोश्री योजनेमार्फत जेष्ठ नागरिकांना सहकार्य करण्यात आले आहे. जिल्ह्यात सर्वाधिक दुध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळवून देण्याचे काम केले आहे, असेही आगरकर यांनी सांगितले.

One who neglects or disregards the existence of earth, air, fire, water and vegetation disregards his own existence which is entwined with them.
— Lord Mahavira

जो पृथ्वी, वायु, अग्नि, जल और वनस्पति के अस्तित्व की उपेक्षा या अवहेलना करता है वह अपने अस्तित्व से, जो उसके साथ जुड़ा है, उसका अनादर करता हैं।
— भगवान महावीर



Jain Agri Park, Jain Hills, Jalgaon, Maharashtra (India). जैन ॲग्री पार्क, जैन हिल्स, जलगाँव, महाराष्ट्र (भारत)।

**We revere these elements of our universe. They reflect our ethos.**
Yellow, Green, Blue and Brown are colours of Nature and have been embodied in our logo.
They encapsulate the conviction of the Founder and
the lasting commitment of the Corporation to agriculture.
Jain Irrigation is striving to add value to the entire agri-chain.
At the same time, they produce and process a complete range of agri-products
for the exacting world markets and growing domestic clientele.
The Corporation is poised to grow and attain water, food and energy security.
— Bhavarlal Hiralal Jain, Founder

हम अपने ब्रह्मांड के इन तत्वों का सम्मान करते हैं। ये हमारे लोकाचार को दर्शाते हैं।
पीला, हरा, नीला और भूरा, प्रकृति के रंग हैं और हमारे 'प्रतीक चिन्ह (लोगो)' में समाहित हैं।
वे संस्थापक के दृढ़ विश्वास और कृषि के प्रति निगम की स्थायी प्रतिबद्धता को दर्शाते हैं।
जैन इरिगेशन संपूर्ण कृषि-श्रृंखला में मूल्य संवर्धन करने के प्रयास के साथ ही उत्पादन और प्रसंस्करण भी कर रहा हैं।
कठिन व स्पर्धात्मक विश्व बाज़ारों और बढ़ते घरेलू ग्राहकों के लिए कृषि-उत्पादों की एक पूरी श्रृंखला का निर्माण करके जल, खाद्य और ऊर्जा सुरक्षा विकसित करने और प्राप्त करने के लिए संस्था कटिबद्ध है।
— भवरलाल हीरालाल जैन, संस्थापक

श्रमण भगवान महावीर जयंती की शुभकामनाएं।

जियो और जीने दो
जैन इरिगेशन सिस्टम्स् लि.
छोटे छोटे कदम. आसमाँ छुनेका दम.
Jain Irrigation Systems Ltd.
Small Ideas. Big Revolutions.
Live & Let Live
www.jains.com

# लक्षवेधी निवडणुका






(पान १ वरुन)

त्यांना काँग्रेसचे उमेदवार एन.एस.काजरोळकर यांनी १४५०० मतांनी पराभूत केले. डॉ. आंबेडकरांना १२३५७६ तर काजरोळकर यांना १३७९५० मते मिळाली. काजरोळकर हे डॉ. आंबेडकरांचे पूर्वाश्रमीचे सहाय्यक होते हे विशेष. कर्मभूमी महाराष्ट्रात झालेल्या पराभवाने डॉ. आंबेडकरांना मनातून दुःख झाले. काँगेस पक्षाने विशेषतः स्वतः पंडित नेहरूंनी डॉ. आंबेडकरांच्या विरोधात त्या मतदारसंघात विशेष जोर लावला होता. असं म्हटलं जातं की आंबेडकरांनी समाजवादी पक्षासी साधलेल्या संधानामुळे नाईलाजाने काँग्रेसला हे पाऊल उचलावे लागले. असे असले तरी कर्मभूमी असणाऱ्या महाराष्ट्रात झालेल्या पराभवाने डॉ. आंबेडकर मनातून व्यथित झाले. दरम्यान बॉम्बे प्रोविन्स मधून त्यांचा खासदार म्हणून प्रवेश झाला असला तरीही १९५४ साली भंडारा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीतदेखील काँग्रेसच्या उमेदवाराकडून त्यांना पुन्हा पराभव स्वीकारावा लागला.

मंगळूरमध्ये जन्मलेले जॉर्ज फर्नांडिस गोवा मार्गे १९४९ साली नोकरीच्या शोधात मुंबईला आले. मुंबईतील सुरुवातीचे दिवस अत्यंत खडतर गेल्यानंतर पुढे कामगार नेते पी. डिमेलो आणि डॉ.राम मनोहर लोहिया यांच्या संपर्कात आल्यानंतर कामगारांच्या प्रश्नांवर कामाला लागले. मनावर डॉ. राम मनोहर लोहिया यांचा मोठा प्रभाव असणाऱ्या फर्नांडिस यांनी बाळासाहेब ठाकरेंबरोबर गिरणी कामगारांसाठी काम करत पुढे टॅक्सी चालकांसाठी मोठी चळवळ उभी केली. त्यांच्या एका इशाऱ्यावर मुंबई बंद होत असे, त्यामुळे त्यांना 'बंद सम्राट' देखील म्हणत. १९६७ साली समाजवादी पक्षातर्फे त्यांनी दक्षिण मुंबई मतदारसंघाची उमेदवारी करण्याचा निर्णय घेतला. त्यांची गाठ होती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, तीन वेळा खासदार आणि दोन वेळा केंद्रात मंत्री राहिलेले स.का. पाटील यांच्याशी. अर्थातच पाटील यांचेच पारडे जड होते. पाटील यांना पराभूत करणे ही गोष्ट सर्वांना अशक्यप्राय वाटत होती. परंतु कोणाला पाडायचे आणि कोणाला जिंकवायचे याची ताकद मतदारांच्या मतात असते हे ओळखून जॉर्ज फर्नांडिस यांनी लोकांच्या मनात 'पाटील हरू शकतात' ही गोष्ट बिंबवायला सुरुवात केली. त्यांनी बोर्ड रंगवले होते 'पाटील कॅन बी डिफिटेड'. पाटील निवडणुकीत पडू शकतात आणि तुम्ही ते पाडू शकता, तुमच्या मतात तेवढी ताकद आहे असा प्रचार करत सुटले. एवढ्यावरच न थांबता मतदानासाठी मतदारांना पैसे देण्याऐवजी भेटेल त्याच्याकडून निवडणूक वर्गणी म्हणून केवळ एक रुपया घ्यायला सुरुवात केली आणि तुझे पैसे निवडणुकीत लागले आहे ही भावना मतदारांच्या मनात निर्माण करून त्यांची एक प्रकारची मानसिकता (आजच्या भाषेत नॅरेटीव्ह) तयार केली. परिणाम असा झाला की भल्याभल्यांचे अंदाज चुकवत वयाच्या केवळ ३६ व्या वर्षी आयुष्यातील पहिली निवडणूक स.का. पाटील यांच्यासारख्या दिग्गज नेत्याला २९ हजार मतांनी धूळ चारत ते 'जायंट किलर' ठरले. त्यावेळची पूर्ण देशातील ही सर्वात लक्षणीय निवडणूक ठरली. पुढे १९७० च्या पोट निवडणुकीत पराभव होऊनदेखील १९७७ साली बिहारच्या मुजफ्फराबाद मतदारसंघातून निवडणूक जिंकली. विशेष म्हणजे त्यावेळी फर्नांडिस डायनामाईटची तस्करी केल्याच्या आरोपात तुरुंगाची हवा खात होते. ते एकदाही मतदारसंघात प्रचाराला जाऊ शकले नाहीत.

पंडित नेहरूंच्या पश्चात कांग्रेसचे नेतृत्व इंदिरा गांधी यांनी सांभाळले. नेहरुंप्रमाणे इंदिरा गांधी यांचीदेखील लोकप्रियता प्रचंड होती. अशातच पाचव्या लोकसभेसाठी १९७१ साली निवडणुका झाल्या. इंदिरा गांधी यांनी उत्तर प्रदेशातील रायबरेली मतदारसंघातून अर्ज भरला. त्यांच्या विरोधात उमेदवार होते संयुक्त समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते राज नारायण. राज नारायण यांनी इंदिरा गांधींच्या विरोधात पूर्ण ताकद उभी केली. त्यांना त्यांच्या विजयाचा इतका आत्मविश्वास होता की ७ मार्च १९७२ साली झालेल्या मतदानानंतर त्यांनी विजयाची मिरवणूक देखील काढली. परंतु १० मार्च रोजी आलेल्या प्रत्यक्ष निकालात इंदिरा गांधी यांनी एक लाखापेक्षा जास्त मतांनी राज नारायण यांचा पराभव केला. राज नारायण यांना हा पराभव पचनी पडला नाही आणि त्यांनी इंदिरा गांधींच्या विरोधात कोर्टात धाव घेतली. राज नारायण यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात केलेल्या अर्जात इंदिरा गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेत भ्रष्ट मार्गांचा वापर केल्याचा आरोप केला. त्यात प्रामुख्याने निवडणूक प्रचारासाठी सरकारी यंत्रणांचा केलेला वापर हा महत्वाचा आरोप होता. सैन्यातील जवान, वायू सेनेचे हेलिकॉप्टर्स, गृह सचिव, पोलिस दल आणि रायबरेलीतील जिल्हा दंडाधिकारीदेखील यांचा मतदार संघात प्रचार सभा घेण्यात वापर केल्याचा आरोप होता. पंतप्रधान सचिवालयातील ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी असणारे अधिकारी यशपाल कपूर यांची इंदिरा गांधी यांचे पोलिंग एजंट म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याआधी त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला असल्याचा कोर्टात युक्तिवाद करण्यात आला , परंतु राजीनामा देण्याआधी शर्मा यांनी इंदिरा गांधी यांच्यासाठी रायबरेलीत दोन सभा घेतल्या होत्या.


इंदिरा गांधींवर वरील बहुतेक आरोप सिध्द झाले आणि प्रत्यक्ष मतदानात हरलेली निवडणूक राज नारायण यांनी कोर्टात जिंकली. १२ जून १९७५ रोजी खटल्याचा निकाल लागून अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची निवड रद्द ठरवत त्यांना सहा वर्षांसाठी कुठलीही निवडणूक लढविण्यासाठी बंदी घातली. इंदिरा गांधी यांनी त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सशर्त स्टे देत गांधी यांना पंतप्रधान पदावर राहण्याची अनुमती दिली , परंतु संसदेत मतदान करण्यास प्रतिबंध केला. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल २४ जून १९७५ रोजी आला आणि त्या निकालाचा फायदा घेत निवडणुका टाळण्यासाठी दुसऱ्याच दिवशी म्हणजे २५ जून रोजी इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर करत विरोधकांची धरपकड सुरू केली. भरीतभर म्हणजे ३९ वी घटना दुरुस्ती करत पंतप्रधान पदाला न्यायपालिकेच्या कक्षेबाहेर ठेवण्याचा प्रयत्न केला.

या काळात पूर्ण देशभरातून इंदिरा गांधीच्या विरोधात तीव्र विरोध निर्माण झाला. आणीबाणी उठली आणि १९७७ साली देशात पुन्हा लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. आजच्या इंडिया आघडीसारखा पहिला प्रयोग त्यावेळी झाला. इंदिरा गांधींना सत्तेतून पायउतार करण्यासाठी सर्व विरोधक एकवटले आणि जनता दल म्हणून एकत्रित निवडणूक लढले आणि २७४ जागा जिंकत सत्तेत आले. परंतु सगळ्यात मोठा विजय होता तो रायबरेलीत. पुन्हा एकदा इंदिरा गांधी विरूध्द राज नारायण अशी लढत झाली. मात्र या वेळेस राज नारायण यांनी मागील पराभवाचा वचपा काढत तब्बल ५५ हजार मतांनी इंदिरा गांधी यांचा पराभव करत ते देशातील सगळ्यात मोठे 'जायंट किलर' ठरले.

महाराष्ट्रातील सर्वात छोटा मतदार संघ कोकणातील राजापूर मतदार संघ. पहिल्या लोकसभेपासून म्हणजे १९५२ पासून ज्येष्ठ समाजवादी नेते नाथ पै यांचा प्रभाव असलेला हा मतदार संघ. १९७१ पासून या मतदार संघाचे नेतृत्व मूळच्या अहमदनगर येथील मधु दंडवते यांनी केले. १९७१ ते १९९१ सलग २० वर्षे त्यांनी राजापूर मतदार संघाचे नेतृत्व केले. सलग पाच वेळा खासदार, दोन वेळा केंद्रीय मंत्री, मोरारजी देसाईंच्या सरकारात रेल्वेमंत्री तर व्ही.पी.सिंग यांच्या सरकारमध्ये अर्थखात्याची जबाबदारी सांभाळत राष्ट्रीय राजकारणात महत्वाचे आणि आदराचे स्थान निर्माण केले. एकेकाळी कोकण रेल्वे म्हणजे त्यांचीच कोकणाला दिलेली सर्वात मोठी भेट. अशा या विद्वान आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाला १९९१ साली काँग्रेसच्या मेजर सुधीर सावंत यांच्याकडून पराभवाचा सामना करावा लागला. परंतु १९९६ सालची निवडणूक जास्त चर्चेत राहिली. यावेळी सुधीर सावंतांबरोबर अजून एक प्रमुख तरुण उमेदवार होते शिवसेनेचे सुरेश प्रभू. पेशाने चार्टर्ड अकाऊंटंट असणारे प्रभू सारस्वत बँकेचे अध्यक्ष होते. कोकणात शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरेंचे चांगलेच वर्चस्व प्रस्थापित झाले होते. समाजवादी विचारसरणीवर त्यांच्या आक्रमक शैलीने मात केलेली होती. परिणामतः नवख्या सुरेश प्रभूंनी एकेकाळी पंतप्रधानपदाचे दावेदार असणाऱ्या मधु दंडवतेंसारख्या दिग्गज आणि विद्वान उमेदवाराचा पराभव केला. विशेष म्हणजे निकाल लागल्यानंतर मधु दंडवते हे सर्वांना उद्देशून भाषण करताना म्हणाले, मला माझ्या पराभवाचे जेवढे दुःख नाही जेवढे तुम्ही एका योग्य आणि लायक उमेदवाराला निवडून दिले याचा मनापासून आनंद आहे.

अलीकडच्या काळात संपूर्ण देशात गाजलेले निवडणूक म्हणजे १९९१ साली अहमदनगर दक्षिण मतदारसंघातील बाळासाहेब विखे विरूध्द यशवंतराव गडाख. लागोपाठ पाचवेळा नगर उत्तरेतून खासदार राहिलेल्या बाळासाहेब विखेंना जेव्हा राजीव गांधींच्या विरोधात कांग्रेस अंतर्गत आघाडी उघडल्यामुळे लोकसभेचे तिकीट नाकारण्यात आले तेव्हा त्यांनी नगरदक्षिण मधून अपक्ष निवडणूक लढवली. त्यांना जनता दलाने पाठिंबा दिला होता. विरोधात होते काँग्रेसचे उमेदवार होते यशवंतराव गडाख. राजीव गांधींनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्याने तत्कालीन काँग्रेसचे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांना जातीने नगरमध्ये लक्ष घालण्यास सांगितले होते. शरद पवारांनी त्यावेळी संपूर्ण मतदार संघ पिंजून काढत अनेक ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. त्या निवडणुकीची रणधुमाळी चांगलीच तापली. निवडणुकीचा निकाल लागला आणि काँग्रेस वरचढ ठरली. यशवंतराव गडाखांनी बाळासाहेब विखे यांचा निवडणुकीत जवळपास ५० हजारांनी पराभव केला. शरद पवारांच्या रणनीती आणि मेहनतीला यश आले. परंतु इकडे बाळासाहेब विखेंनी गडाखांच्या विजयावर आक्षेप घेत ही लढाई न्यायालयात नेली. निवडणुकीदरम्यान आदर्श आचारसंहिता असते आणि ती पाळायची असते याचा उल्लेख संविधानात आहे, परंतु कुठलाही राजकीय पक्ष अथवा नेते त्याकडे सर्रासपणे दुर्लक्ष करत होते. काहींच्या तर आचारसंहिता असते हे गावीही नव्हते. परंतु धोरणी बाळासाहेब विखे यांनी आपल्या चाणाक्ष आणि धूर्त नीतीने कोर्टाची लढाई लढली. निवडणूक प्रचारादरम्यान यशवंतराव गडाख आणि शरद पवार यांनी केलेल्या जाहीर भाषणांमधून आपले चारित्र्य हनन झाले असून, त्यामुळे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाले असून गडाख यांची निवड रद्द ठरवावी असा त्यांचा युक्तिवाद होता. अनेक पुरावे, साक्षी तपासल्यानंतर गडाख यांच्यावरील आरोप सिध्द करत उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने गडाख यांची निवड अवैध ठरवत विखे यांना विजयी घोषित केले. त्याचबरोबर गडाख यांना सहा वर्षांसाठी कुठलीही सार्वत्रिक निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवत शरद पवारांचा देखील लोकशाहीचा मतदानाचा मूळ अधिकार काढून घेतला. यामुळे पवार देखील प्रचंड व्यथित झाले आणि त्यांच्या मनात विखेंविषयी प्रचंड रोष निर्माण झाला. पुढे या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. गडाखांची अवैध निवड कायम ठेवण्यात आली मात्र उच्च न्यायालयाने विखेंना विजयी घोषित करण्याचा निर्णय अवैध ठरवला. सर्वोच्च न्यायालयाने शरद पवारांना देखील दिलासा देत त्यांना मतदानाचा अधिकार पुन्हा बहाल केला.

हा खटला देशाच्या एकूण निवडणूक प्रक्रियेला वळण देणारा ठरला. या निर्णयाची निवडणूक आयोगाने गांभीर्याने दखल घेत निवडणुकीत आदर्श आचारसंहितेचे पालन करणे बंधनकारक केले. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेतील खर्चापासून अनेक गोष्टींवर बंधने आली. गडाख – विखे खटल्याचा निकाल हा देशातील निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील एक लँडमार्क निर्णय मानला जातो!



## राशीभविष्य

- **मेष** : उत्साह, धडाडी वाढेल. नव्या योजना मार्गी लागतील. यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृषभ** : आपलंच म्हणणं खरं हा अट्टाहास टाळा. सरकारी कामं रखडतील. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात.
- **मिथुन** : नव्या विचारांना चालना मिळेल. विलंबाने पण चांगली प्रगती साधता येईल. अपेक्षित कामं होतील.
- **कर्क** : योजलेली कामं मनासारखी होतील. उपजत गुणांचा विकास होईल. नोकरीत अधिकार लाभतील.
- **सिंह** : हाती घेतलेल्या कामात यश लाभेल. शिक्षणातून प्रगतीच्या संधी लाभतील. व्यर्थ चिंता करू नये.
- **कन्या** : भागीदारी व्यवसायात अनुकूलता राहील. महत्त्वाच्या कामांना गती मिळेल. समाधानी रहाल.
- **तूळ** : गुंतवणूक विचारानं करावी. नव्या योजना मार्गी लागतील. अडचणीतून वेळीच मार्ग काढता येईल.
- **वृश्चिक** : संतती संबंधात शुभ घटना घडतील. नव्या संधींचा लाभ उठवावा. प्रतिकूलतेवर मात कराल.
- **धनु** : स्पर्धांमध्ये यश मिळेल. दैनंदिन कामात लक्ष घालावं. विवाह विषयक कार्यात प्रगती होईल.
- **मकर** : योजलेली कामं विचारपूर्वक करावी. जाणकारांचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. विद्यार्थ्यांना यश मिळेल.
- **कुंभ** : विचारांना चालना मिळेल. प्रयत्नातील सातत्यातून यश मिळेल. विद्यार्थ्यांना अनुकूलता वाढेल.
- **मीन** : उत्साहवर्धक घटना घडतील. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. चैनीवर अधिक खर्च होईल.

## सल्ला मोलाचा

### फळं चिरून ठेवताय?

आरोग्य रक्षणासाठी रोजच्या आहारात फळांचा समावेश असण्याकडे आपला कटाक्ष असतो. फळं कापून ठेवावी म्हटलं तर ती लवकर खराब होण्याचा धोका असतो. फळं कापून ठेवली तर फोडींचा रंग बदलतो, फ्रीजमध्ये फळांच्या फोडी साठवल्या तर त्यांना अन्य पदार्थांचा वास लागतो, त्यांचा करकरीतपणा कमी होतो. हे टाळायचं तर काही सोपे उपाय अवलंबायला हवे. ✻ फळांचे काप प्लास्टीकमध्ये अथवा ॲल्युमिनियम फॉईलमध्ये गुंडाळून ठेवल्यास ते चांगले राहतात तसेच ते प्लास्टीकमध्ये ठेवल्यानंतर पिशवीला छोटी छिद्र पाडावीत. ✻ फळांचे काप एका डब्यात झाकून तो थंड पाण्यात ठेवावा. कडेला बर्फ घालून ठेवला तर अधिक चांगलं. ✻ फळांचे काप बाऊलमध्ये काढून त्यावर चमचाभर लिंबाचा रस घालावा आणि चमच्याने हलवून बाऊल झाकून ठेवावा. यामुळे फोडींचा रंग बिघडत नाहीच त्याचप्रमाणे करकरीतपणा टिकून राहतो. या उपायाने सहा तासांपर्यंत फळं ताजीतवानी राहू शकतात. ✻ बाजारात मिळणारी सिट्रस ॲसिडची पावडर फोडींना चोळून ठेवल्यास १० ते १२ तासांपर्यंत फळं रसरशीत राहू शकतात. फळांचा स्वाद किंचितही बदलत नाही.

## दिन विशेष

### २१ एप्रिल

- **१९०९:** मराठी चित्रकार ज. द. गोंधळेकर यांचा जन्म.
- **१९२६:** राणी एलिझाबेथचा (द्वितीय) जन्म.
- **१९५० :** हिंदी आणि मराठी चित्रपट अभिनेते शिवाजी साटम यांचा जन्म.
- **१९९७:** भारतीय पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांचा शपथविधी.
- **२०१३:** ज्येष्ठ गणितज्ज्ञ शकुंतला देवी यांचे निधन.
- **२०१५:** चीनचे अध्यक्ष शि जिनपिंग यांना पाकिस्तान सरकारचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'निशान ए–पाकिस्तान' प्रदान.

## महत्त्वपूर्ण काही...

### महागडी युद्धनौका

१९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तान दरम्यान युद्ध झालं होतं. या युद्धात भारताने पाकिस्तानवर विजय मिळवला होता. या विजयात भारतीय नौदलाचा महत्त्वाचा वाटा होता. भारतीय नौदल जगातल्या ताकदवान नौदलांपैकी एक मानलं जातं. अमेरिकेसारख्या महासत्तेचं नौदलही प्रचंड ताकदवान आहे. अमेरिकेकडे 'यूएसएस गेराल्ड आर फोर्ड' ही जगातली सर्वात महाग आणि अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त अशी युद्धनौका आहे. ही युद्धनौका बांधण्यासाठी ८३,९२८ कोटी रूपये खर्च झाले आहेत. या नौकेचा फ्लाईट डेक पाच एकर जागेत पसरलाय. म्हणजे या डेकवर एका वेळी ७५ विमानं उभी राहू शकतात. या युद्धनौकेचं वजन एक लाख टन इतकं आहे. या युद्धनौकेच्या निर्मितीसाठी एक कोटी फूट लांबीच्या वायर्सचा वापर करण्यात आला. या युद्धनौकेची लांबी ११०६ फूट आहे. युद्धनौकेवर एका वेळी ४६६० कर्मचारी राहू शकतात. या ठिकाणी एका वेळी १५ हजार लोकांचं जेवण बनवण्याची सोय आहे. ही महाकाय युद्धनौका पाहिल्यावर आपणंही तोंडात बोटं घालू.

## आरोग्यमंत्र

### काय हवं आहारात?

वजन कमी करायचं असेल तर आहारात बटाटा वर्ज्य करण्याचा सल्ला दिला जातो. पण कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या अभ्यासानुसार डाएटचं तंत्र पाळल्यास दिवसाला एखादा बटाटा खाल्ल्याने वजन वाढत नाही. त्यामुळे बटाट्याचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असला तरी दिवसभरात तुम्ही एखादा बटाटा खाऊ शकता. याशिवायही डाएटसंबंधी काही टिप्सची नोंद घ्या.



✻ वाटीभर फ्लॉवरमध्ये अवघ्या २९ कॅलरी असतात. म्हणूनच भूक लागली की फ्लॉवरचे पदार्थ खाता येतील. फ्लॉवरची कोशिंबीर, भाजी, सूप असे अनेक पर्याय आहेत.

✻ काले नावाची भाजी बीटा केरोटिन, 'क' जीवनसत्त्व आणि सायटोकेमिकल्सचा स्रोत मानली जाते. यामुळे शरीरातली विषद्रव्यं बाहेर पडतात. ही भाजी सूपमध्ये घालता येईल. या भाजीमुळे पोट भरलेलं राहतं.

✻ ब्रुसेल्स स्प्राऊट हा प्रकारही तुम्ही खाऊ शकता. यात फायबरचं प्रमाण जास्त असतं. कपभर ब्रुसेल्स स्प्राऊट्समध्ये अवघ्या २८ कॅलरी असतात. हे स्प्राऊट्स रात्रीच्या जेवणात खाता येतील. यामुळे अ, क आणि के जीवनसत्त्व मिळू शकेल.

✻ आहारात गाजराचा समावेश करा. कॅरेट सूप हासुद्धा चांगला पर्याय आहे. गाजर भाजूनही खाता येईल. गाजरामुळे पोट भरलेलं राहतं.

## पंचांग

**रविवार, २१ एप्रिल २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र शु. १३, नक्षत्र : उत्तरा
चंद्रराशी : कन्या, व्याघात योग
सूर्योदय: ०६.१९, सूर्यास्त: ६.५६

## फॉरवर्डस

**कव्हरेज क्षेत्राच्या सीमा मोबाईलला असतात, मनाला नाही...**

आपुलकीच्या नात्याला दुरावा माहीत नसतो. कारण कव्हरेज क्षेत्राच्या पलिकडेदेखील मनाचा संपर्क असतो

## टेक्नो टॉक

स्मार्टफोनमध्ये महत्त्वाचा डाटा डाटा लीक होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. त्यासाठी काही सेक्युरिटी ॲप्स तुमच्या मदतीला येऊ शकतात. ✻ प्रायव्हसी नाईट ॲप लॉकमध्ये पिन, पॅटर्न्स, फिंगरप्रिंट्स आणि ॲप लॉकची सुविधा उपलब्ध आहे. यात इनकमिंग कॉल्सही लॉक करता येईल. ✻ नॉर्टन ॲपलॉकमध्येही लॉकिंगचे वेगवेगळे ऑप्शन्स आहेत. तुमच्या फोनमध्ये चुकीचा पासवर्ड टाकला गेला तर फोटो घेतला जातो. त्यामुळे फोन कुणी हाताळलाय हे कळू शकतं. ✻ ॲप लॉकरमध्ये अनेकविध फीचर्स आहेत. यात कस्टमाईझ ॲप लॉकची सोय आहे.

## करिअरवाटा

### अभ्यास करा पर्यावरणाचा

पर्यावरण रक्षणाप्रती सजगता वाढली असून या संदर्भातील उपक्रमांमध्ये तरूणाईचा सहभाग उत्साह वाढवणारा आहे. विशेष म्हणजे या विषयातील उपक्रमांना शासनाचं तसंच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांचं पाठबळ लाभत आहे. त्यामुळे या क्षेत्रात मोठं काम उभं राहत आहे. या क्षेत्रामध्ये कारकिर्द घडवण्याची जिज्ञासा असेल तर 'इकॉलॉजी ॲन्ड एन्व्हायर्नमेंट' या विषयाचे पदविकेपासून पदव्युत्तर पदवीपर्यंत अभ्यासक्रम देशातील विविध महाविद्यालयं आणि विद्यापीठांमधून उपलब्ध आहेत. काही मुक्त विद्यापीठांनी सुरू केलेल्या अशा अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. या विषयाचा बी.एस्सी.चा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून त्यासाठी बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर प्रवेश दिला जातो. यात इकॉलॉजी, एन्व्हायर्नमेंट, झुऑलॉजी आणि बॉटनी हे विषय शिकवले जातात. एकदा ही पदवी प्राप्त केली की केवळ इकॉलॉजी आणि एन्व्हायर्नमेंट या विषयांना वाहिलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. बी.एस्सी.ची ही पदवी घेणारा विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमात वाईल्ड लाईफ म्हणजे वन्य जीवांचा अभ्यास करू शकतो. अर्थात बी.एस्सी.ला प्रवेश घेताना प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणं आवश्यक असतं.



## खेचाखेची

### नकाशावर दाखव

**शिक्षिका:** बंट्या, सांग पाहू यमुना नदी कुठून वाहते?

.

.

**बंट्या:** जमिनीवरुन.

**शिक्षिका:** नकाशावरुन सांग पाहू कुठे वाहते.

.

.

**बंट्या:** नकाशावरुन कशी वाहील मॅडम. तसं असतं तर नकाशा ओला नसता का झाला!

## वेगळं काही


चीनमधील एका कब्रस्तानात आठ हजार वर्षांपूर्वीच्या मृतदेहावर रेशमी कापड मिळाल्यामुळे रेशम आठ हजार वर्षांपूर्वी अस्तित्वात होतं, हे स्पष्ट झालं आहे. चीनमधील डेचाई गोंग नावाच्या संशोधकाने हेनान प्रांतातील जिआहू नजीक शोध घेतला असता त्यांना रेशमाच्या प्राचीनतेसंबधीचा हा महत्त्वपूर्ण पुरावा मिळाला. या भागात तुतीच्या वृक्षांची संख्या मोठी आहे. तुतीच्या वृक्षावरच रेशमाच्या किड्यांची पैदास होते. या अनुकूलतेमुळेच अगदी प्राचीन काळापासून इथले निवासी रेशीम उत्पादन घेत असावेत आणि रेशमी तलम वस्त्रांचा वापर करत असावेत.

## स्टाईल फंडा

### हेअर स्टाईल फॉर समर

उन्हाळ्यात मानेवर रुळणारे केस नकोसे वाटतात. म्हणूनच हेअर स्टाईलबाबत वेगळा विचार करुन हटके स्टाईल करणं योग्य ठरतं.

✻ **डबल बन** – उन्हाळ्यासाठी ही परफेक्ट हेअरस्टाईल आहे. यासाठी केसांचं मधोमध पार्टीशन करावं. त्यानंतर दोन वेगवेगळे बन करावेत. हेअर पिन्सच्या साह्याने सेट करावेत. ✻ **हाफ बन** – सध्या ट्रेंडमध्ये असणारी ही हेअरस्टाईल आहे. हाफ बन घालताना सर्वप्रथम केसांच्या मधला भाग घेऊन आंबाडा घाला. उरलेले केस मोकळे ठेवा. कॅज्युअल आऊटफिटवर ही हेअरस्टाईल खुलून दिसते. ✻ **हाय बन** – सगळे केस एकत्र करून क्राऊन एरियावर बांधणं म्हणजे हाय बन घालणं. साडीसारख्या पारंपरिक कपड्यांवर ही हेअरस्टाईल छान दिसते. ✻ **साईड बन** – एखाद्या कॉर्पोरेट पार्टीसाठी ही हेअरस्टाईल परफेक्ट ठरते. यासाठी सगळे केस डाव्या अथवा उजव्या बाजूला बांधावेत. एका बाजूचा हा आंबाडा वेगळा लूक देतो ✻ **लो बन** – ही स्टाईल करण्यासाठी केसांचं पार्टीशन करून घ्यावं. मानेलगत आंबाडा घालावा. हा आंबाडा फुलवता येतो. बाजूने गजरा गुंडाळल्यास बन आणखी सुंदर दिसतो.



Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा–अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा– अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक– स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी– २३४५२७०, २३४७०८६, मो.– ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

## सुविचार

जो पर्यंत तुम्ही स्वत:वर विश्वास ठेवत नाही तोपर्यंत तुम्ही देवावरही विश्वास ठेवू शकत नाही.

(संकलित)

## सामान्यज्ञान

जर्मनीत विमान प्रवासादरम्यान प्रवाशांना खास गणवेश, हेलमेट आणि विशिष्ट गॉगल डोळ्यावर लावणे सक्तीचे होते, लोकरीने आच्छादीत बूट घालावे लागत. **संकलन - अरविंद ब्राम्हणे**

## मनी ट्रॅप!



शेअरबाजार, सुवर्ण बाजार किंवा स्थावर मालमत्तेमध्ये जेव्हा जेव्हा मोठी तेजी येते तेव्हा सर्वसामान्यांपासून धनिकांपर्यंत सर्वांमध्ये फोमो फॅक्टर ( फियर ऑफ मिसिंग आऊट) म्हणजेच किंमत वाढलेल्या वित्तीय साधनात आपण स्वत: पुरेशी गुंतवणूक न केल्याची खंत निर्माण होते. या मानवी भावनेचा फायदा काही चतुर धूर्त न घेतील तरच नवल !

भूतकाळात डोकावून पाहिल्यास भांडवलवादी नवकल्पनांच्या सुरस कथा नेहमीच गुंतवणूक घोटाळ्यांना आकर्षित करीत असतात. फ्रॉड- न अमेरिकन हिस्ट्री फ्रॉम बर्नम टू मॅडॉफ , या पुस्तकाचे लेखक आणि ड्युक विद्यापीठातील प्राध्यापक एडवर्ड जे बॅलेसेन यांनी सुंदरपणे




मांडले आहे. आर्थिक फसवणुकीसाठी परिचित असलेल्या शब्द म्हणजे पॉन्जी स्कीम. इटालियन उद्योगपती चार्ल्स पॉन्जी याने १९२० च्या दशकात मूळ योजना टपाल तिकिटांसाठी आंतरराष्ट्रीय कुपनच्या कायदेशीर बाबींवर आधारित योजनेतील गुंतवणुकीचे पैसे स्वत:कडे वळवून प्रचंड पैसा गोळा केला. युरोप असो अमेरिका असो किंवा भारत असो , शेकडो वर्षापासूनच्या मानवी मानसिकतेत अजून पूर्णपणे बदल झालेला नाही हेच वारंवार घडणारे घटनांमधून दिसून येते. जास्त व्याजदराचे आमिष असो, फॉरेक्स मधील ट्रेडिंग असो किंवा ब्रोकरेज वाचविणाऱ्या डायरेक्ट प्लॅनमध्ये गुंतवणूका असोत, अपुऱ्या माहितीच्या आधारे कुठल्याही लिंक वर जाऊन पॅन, आधार, बँक अकाउंट सारखी महत्त्वाची माहिती देऊन आर्थिक नुकसानी करून घेणारे दिवसेंदिवस आपल्याच आजूबाजूला दिसत आहेत. इन्स्टिट्यूशन कोट्यातून शेअर्स खरेदी विक्री किंवा फॉरेक्स सारख्या व्यवहारात तर फक्त मोबाईल मधल्या संभाषणांवर विसंबून अनेक सुशिक्षित मोहाला बळी पडत आहेत. अशा फसवणुका टाळण्यासाठी सेबी तसेच आरबीआय यांचे आर्थिक साक्षरता कार्यक्रम कायम चालू असतात. अशा कार्यक्रमातील सहभाग म्हणजे फक्त फॉर्मलिटी न ठेवता प्रत्येक व्यक्ती यामध्ये सक्रिय झाल्यास भविष्यातील अनेक मनी ट्रॅप टाळता येतील हे नक्की !


**- राजेश देशपांडे**
**देशपांडे इन्व्हेस्टमेंट, अ.नगर**
**M.9850724890**


स्वाभिमान संवाद यात्रेची नगरमध्ये सांगता

# मदत करुनही 'ते' माणुसकी विसरले - पवार




**समाचार/नगर-दि.२०**

सध्या माझ्यावर आणि बाळासाहेब थोरातांवर टिका केली जाते. पण त्यांच्या सार्वजनिक जीवनामध्ये आम्ही काहीना काही मदत केली. बाळासाहेब विखे यांना लोकसभा निवडणूक लढवायची होती. त्यांना भाऊसाहेब थोरातांची मदत हवी होती त्यावेळी मी त्यांना घेवून भाऊसाहेब थोरातांची भेट घेतीली त्यानंतर विखे यांनी विजय संपादन केला, असे असतांना आपल्यावर टिका केली जात असेल तर ते माणुसकी विसरले, असा अर्थ होतो, अशी टीका शरद पवार यांनी विखेंवर केली.

नीलेश लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेची काल सायंकाळी नगरमध्ये सांगता झाली. त्यावेळी शरद पवार बोलत होते. या सभेस बाळासाहेब थोरात,अदित्य ठाकरे, रोहित पवार यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते. पवार पुढे म्हणाले की, आपला उमेदवार हिरा आहे तो मतदार संघातील प्रश्न नक्कीच प्रभावीपणे मांडील. त्यांना भाषेची अडचण येणार नाही. लंके यांच्याकडे संपत्ती नाही परंतु माणुसकी आणि लोकप्रेमाचा खजिना आहे. यावेळी बाळासाहेब थोरात आणि अदित्य ठाकरे यांनी भाजपवर सडकून टीका केली.

भूषणसिंह राजे होळकर, आ. रोहित पवार, दादाभाऊ कळमकर, विक्रम राठोड यांची भाषणे झाली.

## पान १ वरुन

### आमचे लक्ष्य विधानसभेवर- शरद पवार

त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसवर जलसिंचन घोटाळ्याचा आरोप केल्याबाबत यावेळी पत्रकारांनी शरद पवारांना विचारणा केली, तेव्हा त्यांनी अजित पवारांचे नाव न घेता टोला लगावला. नरेंद्र मोदींनी याआधीही जलसिंचन घोटाळ्याबाबत आरोप केले होते. तेव्हा त्यांनी ज्यांच्यावर आरोप केले, त्यांना आता सोबत घेऊन ते फिरत आहेत, असे शरद पवार म्हणाले. पवार पुढे म्हणाले, की आमचे लक्ष्य विधानसभा निवडणुकीकडे असून जास्तीत जास्त उमेदवार विधानसभेत पाठवण्याचा आमचा प्रयत्न राहिल. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात पहिला टप्पा झाला. आणखी चार टप्पे आहेत, असे ते म्हणाले. शरद पवारांनी जिल्ह्यातील नेत्यांमध्ये भांडणे लावून जिल्ह्याचे वाटोळे केले, अशी टीका पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली होती. त्याबाबत पत्रकारांनी शरद पवारांना प्रश्न विचारला असता, त्यांच्याबद्दल भाष्य करणे मला योग्य वाटत नाही. त्यांच्यात सातत्य नाही. कधी शिवसेनेत, कधी काँग्रेसमध्ये, आता ते भाजपामध्ये आहेत, असे शरद पवार म्हणाले.

### नेते एकमेकांचे कपडे फाडतील

स्वतःच्या आघाडीतच एकमेकांना तुरुंगात टाकण्याची भाषा करतात, अशा लोकांना लोकसभेत स्थान दिले तर तिथेही ते लोक एकमेकांविरोधात संघर्ष करतील. ४ जूननंतर इंडिया आघाडीचे नेते एकमेकांचे कपडे फाडतील, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नांदेडच्या प्रचार सभेत केली. मोदी पुढे म्हणाले, राहुल गांधी हे वायनाड वगळता आणखी इतर ठिकाणी सुरक्षित मतदारसंघ शोधत आहेत. २६ एप्रिल रोजी वायनाडमध्ये मतदान पार पडल्यानंतर राहुल गांधी दुसरा मतदारसंघ शोधतील. ज्याप्रमाणे त्यांना अमेठी सोडावी लागली. त्याप्रमाणे ते वायनाडही सोडतील.

### गॅस रिफिलिंग सेंटरवर तोफखाना पोलिसांचा छापा

पाच हजार रूपयांचा इलेक्ट्रीक पंप, पाच हजार रूपये किमतीचा इलेक्ट्रीक काटा असा ६९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस निरीक्षक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलीस अंमलदार अहमद इनामदार, वसिम पठाण, संदीप धामणे, सतीष भवर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

श्रीराम कथा महोत्सव : पुष्प पाचवे

# वडिलांच्या आज्ञेनूसार विवाहाचा संस्कार प्रभू श्रीरामांनी केला-प्रभूजी

**समाचार/नगर-दि.२०**

मिथुलानगरीतील राजदरबारात सीता स्वयंवर सोहळ्यातील शिवधनुष्य प्रभू श्रीरामांनी लिलया उचलले. मात्र वडिलांची आज्ञा असेल तरच माझा विवाह होईल, अशी भूमिका घेत भारतीयांसमोर उत्तम कृतीशील आदर्शच उभा केला. वडिलांची आज्ञा घेऊन विवाह करण्याचा संस्कार प्रभू श्रीरामांनी भारतीयांवर केला, असे श्रीमान गौरांगप्रिय प्रभुजी यांनी सांगितले.



पाईपलाइन रोडवरील कादंबरीनगरीत इस्कॉन मंदिरात सुरू असलेल्या श्रीराम कथा महोत्सवाचे पाचवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. व्यासपीठासमोर इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक श्रीगिरीवरधारी प्रभूजी यांच्यासह उपनगरांमधील स्त्री-पुरूष भक्तगण विराजमान झाले होते.

रामायणातील विविध प्रसंगांमधील गूढ उकलून सांगताना श्रीमान गौरांगप्रिय प्रभुजी म्हणाले, जनक राजाने जो राजकुमार शिवधनुष्य उचलेल त्याला सीता वरमाला घालेल, असे जाहिर केले होते. विविध राज्यांचे राजकुमार शिवधनुष्य उचलण्यास आले. सर्वजण धनुष्य उचलण्याचे प्रयत्न करून थकले. शिवधनुष्य उचलणारा एकही बलवान राजकुमार नसल्याचे पाहून जनक राजा चिंतीत झाला असताना लक्ष्मण पुढे होवून माझे बंधू श्रीराम हे कार्य करतील, असे म्हणताच उपस्थित सर्वांच्याच डोळ्यांच्या भुवया उंचावल्या. प्रभू श्रीराम गुरूवर्यांचे आशीर्वाद घेत पुढे झाले. त्यांनी नम्रपणे शिवधनुष्याला नमस्कार केला आणि काय आश्चर्य जणू शिवधनुष्यच त्यांच्या हाती आले. सर्व अवाक् झाले. जनक राजा आनंदीत झाला.

शिवधनुष्य उचलल्याने सीतामाईंशी श्रीरामाचा विवाह होणार हे स्पष्ट झाले. तरीही श्रीरामांनी माझ्या वडिलांची आज्ञा घ्यावी लागेल, असे विनम्रपणे सांगितले. त्यांचा हा विचार आणि विनम्रता भाव सर्वांना अनोखा संदेश देणारा ठरला. रामायणातील हा प्रसंग पुन्हा-पुन्हा आजच्या युवा पिढीसमोर ठेवला तर जन्मदात्यांच्या मनाविरूध्द लग्न करू नये, हे सु-शिक्षित पिढीला कळेल, असे श्रीमान गौरांगप्रिय प्रभुजी यांनी परखडपणे सांगितले.

# नीलेश लंके, राणी लंके, धनश्री विखे यांनी घेतले अर्ज

**समाचार/नगर-दि.२०**

नगर लोकसभा मतदारसंघासाठी शुक्रवारी दुसऱ्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला नाही. महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके व त्यांची पत्नी राणी लंके यांच्यासाठी तसेच महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या पत्नी धनश्री विखे यांच्यासाठी उमेदवारी अर्ज नेण्यात आले आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गुरूवारपासून सुरूवात करण्यात आली आहे. दरम्यान, काल महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके व त्यांच्या पत्नी राणी लंके यांच्यासाठी विजय जालिंदर कराळे (वाकोडी, ता. नगर) यांनी उमेदवारी अर्ज नेला. तर महायुतीचे उमेदवार सुजय विखे यांच्या पत्नी धनश्री विखे यांच्यासाठी ॲड. चंद्रशेखर कोळसे (सावेडी, नगर) यांनी उमेदवारी अर्ज नेला. खा. सुजय विखे व आ. प्राजक्त तनपुरे यांच्यासाठी उमेदवारी अर्ज नेले आहेत.

# शशिकांत रसाळ यांचे निधन

**समाचार/नगर-द्दि.१९**

वनवासी कल्याण आश्रमाचे पूर्णवेळ कार्यकर्ते व हिंदसेवा मंडळाचे माजी अध्यापक शशिकांत गणेश रसाळ यांचे आज दुपारी निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते.

अंतयात्रा आज सायंकाळी साडेसहा वाजता राहत्या घरापासून बुरुडगाव रोड येथून निघणार आहे. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त आहे.

# महिला पोलिस कर्मचाऱ्यास मारहाण

**समाचार/नगर-दि.२०**

सरकारी कर्तव्य बजावित असलेल्या महिला पोलीस अंमलदार यांना शिवीगाळ करून मारहाण केली. भिंगारवाला चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर गुरूवारी (दि.१८) सायंकाळी ही घटना घडली.

याप्रकरणी पीडित महिला पोलीस अंमलदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रकाश सखाराम घोलप (वय ५२, रा. नांगरे गल्ली, नगर) याच्याविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला पोलीस अंमलदार नगर शहरातील एका पोलीस ठाण्यात कार्यरत आहे. त्या गुरूवारी सायंकाळी भिंगारवाला चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सरकारी कर्तव्य बजावित असताना तेथे आलेल्या प्रकाश घोलप याने त्यांना शिवीगाळ करून हुज्जत घातली.

फिर्यादीला हात धरून चापटीने मारहाण केली. तसेच सरकारी कामात अडथळा निर्माण करून भर रस्त्यावर त्यांच्याशी गैरवर्तन केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.दरम्यान सदर घटनेची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना मिळताच पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, सहायक पोलीस निरीक्षक योगिता कोकटे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पीडित महिला पोलीस अंमलदार यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक कोकाटे करत आहेत.

# भीमा नदीच्या काठावरील गावांचा मतदानावर बहिष्कार

**समाचार/नगर-दि.२०**

तालुक्यातील भीमा नदीच्या काठावर असलेल्या गावांना भीमा आसखेड धरणाचे सोडलेले आवर्तनाचे पाणी मिळालेले नाही. यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय आज घेतला आहे. या संदर्भात कर्जत तालुक्यातील भांबोरा येथे सर्व राजकीय पक्षांतील नेते, शेतकरी यांनी एकत्र येत ग्रामसभा घेऊन बहिष्काराचा निर्णय जाहीर केला. यावर प्रशासनाने तात्काळ निर्णय घेतला नाही तर हे बहिष्काराचे लोण उजनी परिसरामध्ये येणाऱ्या सर्व गावांमध्ये पसरण्याची शक्यता आहे. कारण भीमा नदीचे पात्र कोरडेठाक पडले असून, परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. तसेच कायमस्वरुपी बागायत क्षेत्र असणाऱ्या या परिसरातील शेतीवर मोठे संकट आले आहे.

यावेळी नितीन पाटील, वसंत लोंढे, अनमोल लोंढे, राजेंद्र लोंढे, सागर लोंढे, प्रमोद शेळके, दत्तात्रय पाटील, कालिदास गावडे, संजय होलम, गोपीनाथ जगताप, प्रसाद पुंडे, विजय लोंढे, हरिश्चंद्र लोंढे, अरुण लोंढे, शंकर पारखे यांनी पाण्याविषयी भूमिका मांडल्या.

यावर्षी उजनी धरण ६६ टक्के भरलेले असताना सुद्धा पाणीवाटपाचे योग्य नियोजन न केल्यामुळे कर्जत तालुक्यातील ११ गावांना पाणी कमी पडले असून, भीमा पात्र कोरडे पडले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. तसेच शेतीसाठी पाणी कमी पडले असून, पिके जळू लागली आहेत. सन २०१४ पर्यंत पाणी वाटपाचे नियोजन होत होते. त्यामुळे भीमा परिसरात दुष्काळ जाणवत नव्हता. परंतु २०१५ पासून प्रत्येक वर्षी कमी अधिक प्रमाणात ही समस्या जाणवत आहे.




## हनुमान चालिसा

**मंगल भक्त सेवा मंडळ**
शनिवार, दि.२० एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**सिध्देश्वर तरुण मंडळ**
जंगुभाई तालिम ट्रस्ट,
मारुती मंदिर, तोफखाना

रविवार, दि.२१ एप्रिल २०२४
**वर्धमान तरुण मंडळ**
खिस्तगल्ली, कारंजा, अ.नगर
**श्री. किरण शिंगी**

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडल**
शनिवार, दि. २० एप्रिल २०२४
- स्थळ -
**रोकडेश्वर हनुमान मंदिर**
भिंगार

रविवार, दि.२१ एप्रिल २०२४
**अभिषेक भानुदास चिपाडे**
चिपाडे मळा, सारसनगर
अहमदनगर

**श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ**
शनिवार, दि. २० एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**शिव-हनुमान मंदिर**
महालक्ष्मी उद्यानजवळ, भुतकरवाडी

रविवार, दि. २१ एप्रिल २०२४
**हनुमान मंदिर**
लक्ष्मी कारंजा, गांधी मैदान
**किशोर देशमुख**

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)**
शनिवार, दि. २० एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
**पुनम मोतीनगर मित्र मंडळ**
सिताबन लॉनजवळ, सुखसागर
हॉटेल समोर, पुनममोतीनगर

रविवार, दि. २१ एप्रिल २०२४
**ओमप्रकाश बायड परिवार**
गुरुछाया, बागडपट्टी राजा
गणपतीजवळ बागडपट्टी, अहमदनगर


# वाढत्या समस्यांनी कोठीकर त्रस्त

**समाचार/नगर-दि.२०**

समाचार/नगर-दि.१९

कोठी परिसरातील विविध नागरी समस्या बाबत मनपा अतिरिक्त आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचा आरोप- सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिंदे. यांनी केला आहे. कोठी परिसर मार्केट यार्ड रोड येथील बंद अवस्थेत असलेला हॅन्ड पंप दुरुस्त करावे व अहमदनगर कॉलेज येथील विद्युत महावितरण कार्यालय




शेजारी असलेल्या हाजी हसन शहा कादरी कब्रस्तान येथे अनेक भाविक दर्शनासाठी येजा करत असून या ठिकाणी उघडे ड्रेनेज चेंबरवर मोठे स्लॅब टाकण्यात यावे व कोठी चौक ते साळवे घर व लोंढे घरासमोरील सतत ड्रेनेजचे घाण पाणी ओवर फ्लो होत असून संपूर्ण घाण पाणी रस्त्यावर येत आहे. या ड्रेनेजची स्वच्छता करण्यात यावी व चेंबर ब्लॉक काढून देण्यात यावे आणि उघड्या ड्रेनेज चेंबर वर झाकण टाकण्यात यावे व परिसर स्वच्छ करावा, असे निवेदनात म्हटले आहे. मनपा अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांना निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिंदे, आकाश कोरे, विशाल झेंडे, बॉबी गायकवाड, अनिकेत पारधे, वैभव पारधे, अब्रार शेख, विजय झेंडे, सोनू आंग्रे, अफान शेख आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, परिसरात ड्रेनेजच्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात या ठिकाणी दुर्गंधी पसरते व येथे राहणाऱ्या लोकांना व जाण्या येणाऱ्या लोकांना मोठ्या प्रमाणात दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रस्त्यावर उघडे ड्रेनेज आहे व सदर ड्रेनेजवर झाकण नसल्याने कोणतीही दुर्घटना घडू शकते त्यामुळे तेथे झाकण टाकण्यात यावे. लवकरात लवकर परिसरामध्ये औषध फवारणी करण्यात यावी व ड्रेनेजचे लवकरात लवकर काम करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.


**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

समाचार म

# साहित्य मैफल

**भाजपा आणि काँग्रेस या देशातील दोन महत्त्वाच्या आणि ताकदवान राजकीय पक्षांनी आपापला जाहीरनामा मांडून सत्तेत आल्यास आपली दिशा काय असेल, हे स्पष्ट केले आहे. त्यामध्ये भाजपाने गेल्या दहा वर्षात राबवलेल्या योजनांचे आगामी स्वरुप स्पष्ट केले आहे तर दुसरीकडे काँग्रेसने रोजगार, शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीस देण्यात येणारी चालना, समलिंगींच्या विवाहाचा कायदा यासारखे मुद्दे हाताळले आहेत. याविषयी...**

## जाहीरनाम्यांचा लेखाजोखा




भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या देशातील दोन मोठ्या आणि महत्त्वपूर्ण राजकीय पक्षांनी नुकतेच आपापले जाहीरनामे प्रसिद्ध केले. निवडणुकांच्या आधी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या जाहीरनाम्यांमधून त्यांची भविष्यातील उद्दिष्ट्ये, ध्येये आणि कार्यपथ स्पष्ट होत असतो वा मांडला जात असतो. त्यांच्या कार्याची दिशा कशी राहणार आणि समाजासाठी ते काय करणार, याची कल्पना यातून स्पष्ट होत असते. या दृष्टीने बघता भाजपाने २०१४ च्या जाहीरनाम्यामध्ये शेतकऱ्यांसाठी १०० टक्के नफ्याचे धोरण जाहीर केले होते. हीच स्वामिनाथन आयोगाची सूचनाही होती. मात्र २०१४ मधील ही बाब २०२४ च्या जाहीरनाम्यात नाही. केवळ किमान आधारभूत किंमत (एमएसपी) असा उल्लेख असला तरी ही किंमत नेमकी किती आणि कशी वाढवली जाईल, याबद्दल कोणतेही भाष्य करण्यात आलेले नाही. त्यामुळे आपल्याच आधीच्या जाहीरनाम्यातील ही बाब यंदा हरवलेली दिसत आहे. दुसरीकडे, आत्ताच्या काँग्रेसच्या जाहीरनाम्यात स्वामिनाथन आयोगाच्या एमएसपीचा उल्लेख आहे, त्यांच्या शिफारसींचा उल्लेख आहे. मात्र सत्तेत असताना त्यांनीच या शिफारशी स्विकारल्या नव्हत्या आणि आता त्यांनी त्या संसदेत सांगितल्या. थोडक्यात, या पक्षाची याबाबत नेमकी स्पष्टता आढळून येत नाही. ते शेतकऱ्यांसाठी कशा पद्धतीने काम करणार हे जाहीरनाम्यातून स्पष्ट होत नाही. आकडेवारी बघितली तर, २०१३-१४ मधील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि २०२३ मधील आकड्यामध्ये फारसा फरक दिसत नाही. गेल्या वर्षभरात ११,५०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळेच आकडेवारीनुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये फारसा फरक झाल्याचे दिसत नाही. त्यामुळेच या मुद्द्यावर अधिक तपशीलवार माहिती येणे अपेक्षित होते. मात्र ते आलेले नाही.

भाजपाच्या जाहीरनाम्यात कायमच समान नागरी कायद्याचा उल्लेख आढळून आला आहे. तसा तो या वेळीही आहे. मात्र त्यात तपशील आलेला नाही. सध्या तरी या कायद्याचा एकच ड्राफ्ट उत्तराखंडमध्ये समोर आला असून अनेक आक्षेपही समोर आले आहेत. जाहीरनाम्यात ते सुधारण्याचा प्रयत्न दिसलेला नाही. खेरीज या कायद्यामुळे हिंदू कायद्यात होणारे आणि हिंदूंवर परिणाम करणारे बदल याविषयीही भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. उदाहरणार्थ, हिंदूंना मिळणारा अविभक्त कुटुंबाचा फायदा काढून टाकणार का, काढून टाकणार नसल्यास तो समान नागरी कायदा कसा राहणार असे काही प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. मात्र त्याविषयी काहीही स्पष्टता बघायला मिळालेली नाही.

काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात 'समान नागरी कायदा' असे म्हटले नसले तरी पर्सनल लॉ (वैयक्तिक कायदा) मध्ये आवश्यक ते बदल केले जातील, असे म्हटले आहे. पण त्याचेही तपशील दिले न गेल्याने ढोबळ वाक्यापलिकडे फारसे आकलन होत नाही. याचा विचार करुन, तज्ज्ञांची मते घेऊन आम्ही याविषयी कृती करु, एवढे म्हणणे पुरेसे वाटत नाही. कारण काही वैयक्तिक कायदे राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या विरोधात जाणारे आहेत. त्यामुळे ते बदलणे गरजेचे आहे. हे काँग्रेसनेही ठामपणे म्हणणे गरजेचे होते. मात्र त्यांच्या जाहीरनाम्यात हेदेखील दिसत नाही. हे दोन्ही पक्ष जाहीरनाम्यांद्वारे इलेक्टोरल बाँड्सबद्दल काहीही बोललेले नाहीत. इलेक्टोरल बाँड्सची खूप मोठी स्कीम आली. पण अलिकडेच ती असंवैधानिक ठरली. अर्थात या स्कीमचा सर्वाधिक फायदा भाजपाला झाला. जवळपास ५० टक्के फंड्स त्यांना मिळाले तर काँग्रेसने कितीही विरोध केला असला तरी त्यांनाही याद्वारे तेराशे कोटी रुपये मिळाले. मात्र पॉलिटिकल फंडिंग आणि त्यातील पारदर्शकता याबाबत हे दोन्ही पक्ष आपल्या जाहीरनाम्यांमध्ये काहीही बोलत नाहीत. त्यामुळे हा विषयही विचारात घ्यायला हवा, कारण हे फंडिंग राजकीय पक्षांसाठी अत्यंत महत्त्वाचे असते. नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) हादेखील एक महत्त्वाचा मुद्दा असून भाजपाने त्यांच्या जाहीरनाम्यात याविषयी सांगितले आहे. काँग्रेसने या कायद्याला विरोध केला आहे. मात्र आश्चर्यकारकरित्या त्यांच्या जाहीरनाम्यामध्ये यावर कोणतेही भाष्य दिसत नाही. जाहीर भाषण वा पत्रकार परिषदांमध्ये याविषयी केलेला विरोध जाहीरनाम्यामध्ये मात्र दिसून येत नाही. त्यामुळे सत्तेत आल्यास ते हा कायदा बदलतील की नाही, याविषयी घेतलेली संदिग्ध भूमिकाच समोर येते.

न्यायालयाने समलिंगी विवाहाबद्दल मत मांडताना हे संसदेचे काम असून त्यांनीच अशा लग्नांना संमती द्यावी, असे सांगितले होते. मात्र त्या कायद्याबद्दल भाजपाच्या जाहीरनाम्यात काहीही दिसत नाही. अर्थात भाजपाने समलिंगी विवाहाला विरोधच केला आहे. मात्र त्यांना वा या गटातील अल्पसंख्याकांना काही सुविधा दिल्या जातील का, त्यांच्याविषयी काय वेगळे केले जाईल याचा उल्लेख काँग्रेसच्या जाहीरनाम्यात आहे. ही चांगली बाब म्हणावी लागेल. याखेरीज महानगरपालिकांचा कायदा किंवा त्याबाबत लोकांना जास्त अधिकार देणारा कायदा खरे तर यायला हवा. याबद्दल फारसे कोणी बोलत नसले तरी याची गरज आहे. आता ग्रामीण भागात ग्रामसभेचा कायदा आहे. त्यामुळे तिथे लोक स्थानिक बाबतीत थेट निर्णय घेतात. मात्र तसा वॉर्डसभेचा कायदा शहरी भागातील नागरिकांसाठी नाही. त्यामुळे शहरी भागातील लोकांना असा अधिकारच मिळत नाही.

हे लक्षात घेता हा कायदा आणि घटना दुरुस्ती यायला हवी. ७३ वी घटनादुरुस्ती ग्रामीण भागासाठी आली. तशी ही दुरुस्ती आणण्याविषयी दोन्ही पक्षांच्या जाहीरनाम्यात कोणताही उल्लेख आढळत नाही. खेरीज शहरी भागातील शासन सुधारण्यासाठी शहराची महापालिका यंत्रणा बदलण्याचा प्रस्ताव काँग्रेसच्या जाहीरनाम्यात आहे. महापौर थेट निवडला जावा, महापौराला पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांसारखे थेट कार्यकारी अधिकार असावेत असे त्यांच्या जाहीरनाम्यात स्पष्ट म्हटले आहे. पूर्वी भाजपानेही अशी भूमिका घेतली होती. मात्र आपल्या जाहीरनाम्यात त्यांनी याचा उल्लेख केलेला नाही. शहरी शासन सक्षम करण्याबाबतचा उल्लेख वा त्याबद्दलची भूमिका त्यांनी स्पष्ट मांडलेली नाही. जाहीरनाम्यात खासदारांविषयीच्या काही व्यक्तिगत गोष्टी असायला हव्यात. उदाहरणार्थ, संसदेतील त्यांची उपस्थिती, वेगवेगळे अहवाल मांडणे, समित्यांमध्ये चर्चा होणे याविषयी अनेक खासदार नागरिकांना माहिती देत नाहीत. किंबहुना, या वेळची लोकसभा खूपच कमी काळ चालली. अधिवेशनांचे दिवस बरेच कमी होते. त्यामुळे खासदार म्हणून समोर येणारी व्यक्ती चर्चेत कसा सहभाग घेईल, जनतेचे प्रश्न संसदेत कसे उपस्थित करेल आणि कसा पाठपुरावा केला जाईल, हे मुद्देही जाहीरनाम्यामध्ये स्पष्ट करायला हवेत. मात्र संसदीय कामकाज सुधारण्याच्या दृष्टीने कोणतेही मुद्दे या दोन्ही मोठ्या राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात दिसत नाहीत.

सध्या बेरोजगारीचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. मात्र भाजपाच्या जाहीरनाम्यात ती कमी करण्याविषयी काहीही आश्वासन देण्यात आलेले नाही. खरे तर या पक्षाने कौशल्यविकासावर बराच भर दिला होता. मात्र आधीच्या जाहीरनाम्यात होते तेवढ्या मोठ्या प्रमाणातील आश्वासन आता दिसत नाही. एका अहवालानुसार नुकतेच पदवी घेऊन बाहेर पडलेले निम्मे युवक-युवती आज कोणत्याही रोजगाराविना आहेत. यावर पक्षांची नेमकी काय भूमिका असेल, हेदेखील जाहीरनाम्यांमध्ये स्पष्ट केलेले नाही. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात जवळपास तीस लाख सरकारी नोकऱ्यांमधील पदे भरण्याचे जाहीरनाम्यात स्पष्ट केले आहे. पण इतक्या मोठ्या प्रमाणात पदे भरल्याने सरकारवर किती मोठा ताण येईल याचा विचार केलेला दिसत नाही. तीस लाख पगार तसेच इतर सुविधा देणे कोणत्याही सरकारसाठी खचितच खूप मोठी बाब आहे. म्हणूनच हे आश्वासन देताना तारतम्याने विचार केला आहे की नाही, अशी शंका येते.

सरतेशेवटी सांगायचे तर, काँग्रेसच्या जाहीरनाम्यात अशा अनेक गोष्टी आहेत, ज्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होईल, हे बघावे लागेल. एमएसपी देऊ, मुबलक रोजगारसंधी देऊ असे म्हणणे ही एक बाब असते, पण त्यामुळे सरकारवर पडणारा बोजा वेगळा असतो. दुसरीकडे, भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात आहेत त्याच बाबी पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र हे बघत असताना गेल्या दहा वर्षांमध्ये त्यांची खरोखर अंमलबजावणी झाली आहे का आणि असेल तर किती झाली आहे, याचा विचार मतदारांनी करायला हवा. उदाहरणार्थ, 'आयुष्मान भारत'सारखी योजना कल्पनेत खूप चांगली आहे. मात्र प्रत्यक्षात यातील अनेक चुकीच्या बाबी कॅगच्या अहवालातून समोर आल्या. त्यामुळेच या सर्व आश्वासनांना न भूलता तारतम्याने निर्णय घेण्याची जबाबदारी आता मतदात्यांची आहे.

नोंद
तन्मय कानिटकर
प्रख्यात अभ्यासक

**ऐन लोकसभा निवडणुकीच्या काळात केजरीवाल यांच्यासह 'आप'चे अनेक नेते तुरुंगात आ-हेत. 'आप' मध्ये नेतृत्त्वाची पोकळी तयारी झाली आहे. गैरव्यवहाराचे भांडवल करून निवडून आलेल्या 'आप'चे नेतेच भ्रष्टाचारात आकंठ बुडाल्याचे चित्र पुढे आणत भाजपने या पक्षाच्या पंजाबमधील काही नेत्यांना गळाला लावले आहे. ताज्या पडझडीनंतर संपूर्ण पक्षच संकटात सापडल्याचे दिसत आहे.**

## आरोपांचा ताप, संकटात 'आप'




दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्या अटकेपासून पक्षात अस्वस्थता वाढत आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या काळात केजरीवाल यांच्यासह अनेक नेते तुरुंगात आहेत. लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराची धुरा आता तुरुंगातून सुटलेले खासदार संजय सिंह यांनी खांद्यावर घेतली असली तरी उपराज्यपाल व्ही. के. सक्सेना यांच्यासह भाजप, 'ईडी', 'सीबीआय' यासारख्या यंत्रणांनी ज्या पद्धतीने केजरीवाल यांच्यावरील कारवाईचा फास आवळत आणला आहे, ते पाहता आता 'आप' मध्ये नेतृत्त्वाची पोकळी तयारी झाली आहे. त्यातच भारतीय जनता पक्षाने केलेल्या व्यूहरचनेला यश येत असल्याचे दिसते. 'आप'ज्या गैरव्यवहाराचे भांडवल करून निवडून आला, त्या पक्षाचे नेतेच भ्रष्टाचारात आकंठ बुडाल्याचे चित्र भाजपने पुढे आणले आहे. 'आप'चा झाडू आता स्वच्छतेच्या कामाचा राहिलेला नाही. आता 'आप'चीच स्वच्छता करण्याची गरज असल्याची मानसिकता भाजप तयार करत आहे. त्यातून काही नेत्यांना त्याने गळाला लावले आहे. पंजाबमधील 'आप'चे एकमेव लोकसभा खासदार सुशीलकुमार टिंकू यांनी अलिकडेच पक्ष सोडून भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्यासोबत 'आप'च्या एका आमदारानेही भाजपमध्ये प्रवेश केला. आता तयार होत असलेली परिस्थिती पाहता संपूर्ण पक्षच संकटात सापडल्याचे दिसत आहे.

केजरीवाल यांच्या अटकेपासून आम आदमी पक्षाच्या सुमारे सात खासदारांनी ठेवलेले अंतर अनाकलनीय आहे. यासंदर्भात त्यांनी केलेला युक्तिवाद कोणालाच मान्य होईल असे वाटत नाही. दिल्ली सरकारचे मंत्री राजकुमार आनंद यांनी अलिकडेच दिलेला राजीनामा पक्षाला आणखी घाबरवण्यासाठी पुरेसा आहे. भाजपकडून आम आदमी पक्ष फोडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप पक्षाचे नेते सातत्याने करत आहेत. २१ मार्च रोजी 'आप'चे राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक झाल्यापासून आम आदमी पक्षाने दिल्ली तसेच देशाच्या इतर भागात जोरदार निदर्शने केली; परंतु या आंदोलनांमध्ये 'आप'च्या दहा राज्यसभा सदस्यांपैकी बहुतांश सदस्य दिसले नाहीत. या वेळी कार्यकर्त्यांसोबत फक्त संजय सिंह, संदीप पाठक आणि एन. डी. गुप्ता हेच आंदोलनात सहभागी झाल्याचे दिसले. छोट्या पक्षावर आंदोलन करण्याची वेळ येते, तेव्हा सारे नेते प्रकर्षाने उपस्थित असायला हवेत. गैरहजर नेते लगेच लक्षात येतात. मोठ्या पक्षात काही लोक अनुपस्थित राहिले, तरी फार फरक पडत नाही. काही लोक गैरहजर राहिले, त्यांनी आपल्या नेत्याच्या अटकेविरोधात आवाज उठवला नाही तरी खपून जाते; पण आम आदमी पक्षात असे काही घडणार नाही.

केजरीवाल तुरुंगात असून त्यांना पक्ष फुटण्याची भीती सतावते आहे. त्यांच्या पत्नी सुनीता सक्रिय झाल्या असल्या, तरी एक एक आमदार, खासदार आता ज्या प्रकारे बाहेरचा रस्ता धरतो आहे, ते पाहता नेता अडचणीत आल्यानंतर अन्य लोकांच्या निष्ठा कशा पातळ होतात, हे केजरीवाल यांना अनुभवाने कळले असेल. 'आप'च्या राज्यसभा खासदारांच्या आंदोलनात सहभागी न होण्याच्या वृत्तीवर पक्ष आपल्या व्यासपीठावर चर्चा करेल, असे खासदार संजय सिंह यांनी सांगितले. यावरून ते स्वतः त्यांच्या खासदारांच्या वृत्तीवर आणि गैरहजर राहण्यावर नाराज असल्याचे दिसते. पक्ष त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे ऐकू शकते. त्यामुळे आणखी संकट निर्माण होईल. पक्ष कमकुवत झाल्याचा संदेशही जनतेत जाईल. कमकुवत पक्षाच्या समर्थकांनाही निवडणुकीत मतदान करायचे नसते. आम आदमी पक्षाचे पंजाबमधील खासदार राघव चढ्ढा हे पक्षाचा कणा राहिले आहेत. पत्रकार परिषदांमध्ये ते प्रत्येक मुद्द्याला तसेच प्रश्नाला अतिशय संक्षिप्तपणे उत्तरे देतात. त्यांनी लहान वयातच पक्षात प्रवेश केला. पात्रता पाहून केजरीवाल यांनी त्यांना राज्यसभेवर पाठवले. पक्षाच्या सर्वात मोठ्या नेत्याची तुरुंगात रवानगी झाली असताना राघव यांची अनुपस्थिती लोकांच्या चर्चेचा विषय बनली. चढ्ढा गेल्या महिन्यात डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी लंडनला गेले होते. मार्चच्या अखेरीस ते परतणार होते. ते आतापर्यंत दिल्लीत असायला हवे होते; परंतु ते अजूनही लंडनमध्येच आहेत. त्यांची पत्नी अभिनेत्री परिणीती चोप्रा भारतात आली आणि परतही गेली.

२१ मार्च रोजी केजरीवाल यांना अटक झाल्यापासून चढ्ढा यांची टिवटिवही बंद झाली आहे. खासदार संजय सिंह यांनी तुरुंगातून सुटल्यावर आनंद व्यक्त करत स्वतःचा आणि **(पान ५ वर)**

विश्लेषण
राही भिडे
ज्येष्ठ पत्रकार

**मध्यपूर्वेमध्ये युद्धाची व्याप्ती वाढण्याची शक्यता कमी असली तरी समुद्रमार्गी व्यापारावर विपरीत परिणाम होत आहे. बरेच आंतरराष्ट्रीय हवाई मार्गही मध्यपूर्वे वरुन जातात. त्यांना दूरचा फेरा घेऊन जावे लागत आहे. अशा प्रकारे मध्यपूर्वे तील अशांततेचा जागतिक अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे. इराण आणि इस्त्रायलमध्ये उघड युद्ध सुरू झाल्यास भारतीय परराष्ट्र धोरणालाही तारेवरची कसरत करावी लागणार आहे.**

## विश्वसंचार मध्यपूर्वेवर युद्धाचे सावट




अलिकडेच इराणने क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे इस्त्रायलच्या हवाई क्षेत्रात हवाई दलाच्या ठिकाणांवर हल्ले केले. इस्त्रायलच्या म्हणण्यानुसार, इस्त्रायल आणि अमेरिकेच्या क्षेपणास्त्रविरोधी प्रणालींनी ९० टक्के क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट केली. इस्त्रायलच्या अधिकृत वक्तव्यानुसार या देशाची यात नगण्य हानी झाली. याआधी एक आठवड्यापूर्वी इस्त्रायलने सीरियास्थित इराणी दूतावासावर हवाई हल्ले करुन इराणच्या उच्च सैनिक अधिकाऱ्यांना सावज बनवले होते. इराणच्या म्हणण्यानुसार, इस्त्रायलवरील हल्ला हे यालाच दिलेले उत्तर होते. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार एखाद्या देशाची वकिलात त्या देशाचाच भाग मानला जातो. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या इस्त्रायलने दूतावासावर केलेला हल्ला हा प्रत्यक्ष इराणवरील हल्ला मानला जातो. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने केलेला क्षेपणास्त्र हल्ला राष्ट्रसंघांच्या नियमांच्या चौकटीतही बसतो. परंतु, प्रत्यक्ष राजकारण आणि युद्धकारण नियमांनुसार चालत नाही, हे वास्तव आहे. इस्त्रायलने आजपर्यंत अनेकदा आंतरराष्ट्रीय कायद्यांचा भंग करुन शेजारी देशांवर हवाई हल्ले केले आहेत. थोडक्यात, मध्यपूर्वेत 'बळी तो कान पिळी' हाच न्याय इस्त्रायलने वापरला होता. इराणच्या या ताज्या हल्ल्याचे नाविन्य असे की, आजपर्यंत कोणत्याही दुसऱ्या देशांनी इस्त्रायलच्या भूमीवर हल्ला करण्याची गेल्या पन्नास वर्षांमधील ही पहिलीच घटना आहे. इस्त्रायलवर पॅलेस्टिनींचे सतत दहशतवादी हल्ले होत आले आहेत. परंतु, एका सार्वभौम देशाने इस्त्रायलवर हल्ला करण्याची ही पहिलीच घटना मानावी लागेल. यातून एक गोष्ट सिद्ध होते, ती म्हणजे आजपर्यंत मध्यपूर्वेच्या प्रदेशात इस्त्रायलची लष्करी मक्तेदारी आता संपुष्टात आली आहे. हल्ल्यात प्रत्यक्ष झालेल्या नुकसानापेक्षा हा राजकीय परिणाम जास्त महत्त्वाचा आहे.

आजपर्यंत इराण इस्त्रायलविरुद्ध अप्रत्यक्ष युद्ध लढत होता. परंतु, प्रथमच अशा प्रकारे प्रत्यक्ष बलप्रयोग करुन इराणने आपली लष्करी ताकद दाखवून दिली. अर्थातच हा सर्व घटनाक्रम गेल्या वर्षी सात ऑक्टोबर रोजी हमास संघटनेने इस्त्रायलवर केलेल्या दहशतवादी हल्ल्यापासून सुरू होतो. त्यावेळीदेखील इस्त्रायलने हमासला इराणची मदत असल्याचा दावा केला होता. इराणने हा दावा खोडून काढला नाही परंतु, हमासच्या निर्णयात आपला सहभाग नव्हता असाही दावा केला. हमासच्या या हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल इस्त्रायलने गाझा पट्टीवर हल्ला करुन हमासचा संपूर्ण पराभव करुन त्या संस्थेला नष्ट करण्याचा चंग बांधला. मग हमासच्या मदतीसाठी इराणने येमेनमधील हुती बंडखोर आणि सीरिया तसेच लेबॅनॉनमधील हिजबुल्ला संघटनेची मदत घेऊन समुद्रावर आणि इस्त्रायलच्या जमिनीवर हल्ले करण्यास सुरूवात केली. अशा प्रकारे गाझामधल्या हमासला वाचवण्याचा प्रयत्न करण्यासाठी इराणने युद्धाची व्याप्ती वाढवली. परंतु, आत्तापर्यंत प्रत्यक्ष आपले सैन्य वा हवाई दल इराणने वापरले नव्हते. आता त्यांनी प्रत्यक्ष सैन्य वापरल्यामुळे इस्त्रायलला इराणविरुद्ध हवाई हल्ले करायला सबब मिळाली आहे. गेल्या अनेक दशकांपासून इस्त्रायल इराणच्या अण्वस्त्र क्षमतेला लक्ष्य करु इच्छित होता. त्यामुळे इराणने आजपर्यंत सावधगिरीचे धोरण वापरुन इस्त्रायलाला ही सबब मिळू नये, असा प्रयत्न केला होता. आता इराणने या भूमिकेत बदल करण्यामागे अनेक कारणे आहेत. त्या दृष्टीने एकूणच मध्यपूर्वेचा इतिहास आणि भौगोलिक सामरिक परिस्थितीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

जगाची जेमतेम तीन टक्के लोकसंख्या मध्यपूर्वेमध्ये आहे. परंतु, ५६ टक्के खनिज तेलसाठा या प्रदेशात आहे. मध्यपूर्वेने तेलाचे भाव वाढवले की संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. खेरीज हा प्रदेश भौगोलिकदृष्ट्या मध्यपूर्व युरोप आणि आशिया या समुद्री दळणवळणाच्या मार्गावर महत्त्वाचा अंकुश ठेवून आहे. या कारणांमुळे जगातील सर्व महासत्ता मध्यपूर्वेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न सतत करत राहिल्या आहेत. त्यातच मध्यपूर्वेवर इस्लामी जगाचे नेतृत्व करण्याच्या शर्यतीत सौदी अरेबिया आणि इराण हे दोन मुख्य मोहरे आहेत. पॅलेस्टिनीयन लोकांना इराणचे समर्थन मिळण्याचे कारण म्हणजे एकूणच इस्लामी जगताचे नेतृत्व आपल्या हाती ठेवण्याचा इराणचा प्रयत्न आहे. मध्यपूर्वेतील त्यांची धोरणे याच प्रयत्नांचा एक भाग आहे. अगदी १९८० च्या दशकापर्यंत इराण आणि सौदी अरेबिया हे दोन्ही देश अमेरिकेच्या गोटात होते. परंतु, १९७९ च्या क्रांतीनंतर इराणमध्ये अमेरिकाविरोधी शासन अस्तित्वात आले. त्यानंतर आपल्या देशाप्रमाणेच इतर देशांमध्येही अमेरिकेविरोधात क्रांती करण्याचा प्रयत्न इराणने चालवला आहे. परंतु, गेली अनेक दशके प्रयत्न करुनही इराणला त्यात म्हणावे तसे यश मिळाले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे इराण हा शियापंथीय देश आहे आणि उरलेले ८० टक्के इस्लामी जगत सुन्नी पंथाचा अवलंब करते. हा शिया-सुन्नी वाद गेली हजार वर्षे सुरू आहे. पाकिस्तानसारख्या देशात तर शियापंथीय लोकांना मुस्लीमही मानले जात नाही.

अशा प्रकारे खोलवर रुजलेल्या या कारणांमुळे इस्लामी जगताचे नेतृत्व करणे इराणसाठी मृगजळच आहे. पण दुर्दैवाने इस्लामी मुल्ला-मौलवींना या वास्तवाचे भान नाही. म्हणूनच गेल्या अनेक वर्षांपासून इराणची अर्थव्यवस्था डबघाईला आली आहे. वर्षभरापूर्वी इराणमध्ये महिलांना हिजाबची सक्ती करण्यावरुन मोठ्या प्रमाणात जनक्षोभ उसळला होता. इराणच्या सरकारने बलप्रयोग करुन हा उठाव चिरडून टाकला. एक प्रकारे इस्त्रायलने इराणी दूतावासावर केलेल्या हल्ल्याचे भांडवल करुन इराणचे मुल्ला-मौलवी सत्तेवरील आपली पकड घट्ट करु इच्छित आहेत. या युद्धाची व्याप्ती वाढते की मर्यादित राहते हे अमेरिकेच्या धोरणावर अवलंबून असणार आहे. सध्या अमेरिका युक्रेनमध्ये रशियाविरोधी युद्धात गुंतलेली आहे. त्यातच इस्त्रायलच्या गाझा पट्टीतील नरसंहारामुळे अमेरिकेतील बऱ्यापैकी जनमत इस्त्रायलच्या विरोधात गेले आहे. अशा परिस्थितीत इस्त्रायलने युद्धाची व्याप्ती वाढवून प्रत्यक्ष इराणवर हल्ले केले तर त्याचे समर्थन करणे अमेरिकेला कठीण जाईल. अमेरिकेच्या संपूर्ण पाठिंब्याशिवाय इस्त्रायल अशी पावले उचलू शकत नाही, हे वास्तव आहे. त्यामुळे अमेरिकेचे धोरण काय असेल, यावर मध्यपूर्वेतील शांतता अवलंबून आहे.

इस्त्रायल-इराणमधील संघर्ष अशा प्रकारे वाढल्याचा भारतावर विपरीत परिणाम होऊ शकतो. इस्लामी जगात आपण इराणशी नेहमीच चांगले संबंध ठेवले आहेत. इराणद्वारे पाकिस्तानवर एक प्रकारे दबाव आणला जातो आणि त्यामुळे भारताविरुद्ध पाकिस्तानच्या कारवाया गेल्या काही वर्षांमध्ये कमी झाल्या आहेत. त्यातच महिनाभरापूर्वी इराण आणि पाकिस्तानने एकमेकांच्या प्रदेशावर हवाई हल्ले केले होते. त्यात आपण इराणच्या बाजूने समर्थनास उतरलो होतो. इस्त्रायलशी असलेले आपले चांगले संबंध आणि मैत्री गेल्या अनेक दशकांपासून सर्वश्रुत आहे. त्यामुळे इराण आणि इस्त्रायलमध्ये उघड युद्ध सुरू झाल्यास भारतीय परराष्ट्र धोरणाला तारेवरची कसरत करावी लागणार आहे. सध्याच्या जागतिक सत्तासंतुलनात इराण, रशिया आणि चीन एका बाजूला तर अमेरिका, युरोपीय देश आणि मध्यपूर्वेत सौदी अरेबिया आणि इजिप्त अशी विभागणी झाली आहे. या आधीदेखील सीरियामधील इराणच्या हस्तक्षेपाला रशिया आणि चीन या दोघांचेही पाठबळ होते. परंतु, आज रशिया युक्रेनच्या युद्धात पूर्ण गुंतला असल्यामुळे इराणच्या मदतीस येऊ शकत नाही. चीनने मात्र या सर्व संघर्षात नेहमीच सावधगिरीची भूमिका घेतली आहे. चीनकडून इराणला केवळ राजकीय पाठिंबा दर्शवला जातो पण, प्रत्यक्षात चीनी सैन्य किंवा शस्त्रास्त्रे इराणला गेल्याचे ऐकिवात नाही. अर्थातच याचे कारण म्हणजे चीनची लष्करी शक्ती अमेरिका आणि रशियाच्या तुलनेत कमी आहे. चीनी नौदल हिंद महासागरही वर्चस्व प्रस्थापित करु शकलेले नाही. त्यामुळे चीनने हात दाखवून अवलक्षण करुन घेण्यापेक्षा मध्यपूर्वेच्या पेचप्रसंगापासून दूर राहणेच पसंत केले आहे.

मध्यपूर्वेमध्ये युद्धाची व्याप्ती वाढण्याची शक्यता कमी असली तरी समुद्रमार्गी व्यापारावर विपरीत परिणाम होत आहे. आंतरराष्ट्रीय हवाई मार्गही मध्यपूर्वेवरुन जातात. त्यामुळे आता हवाई सेवांना दूरचा फेरा घेऊन जावे लागत आहे. अशा प्रकारे मध्यपूर्वेतील या अशांततेचा जागतिक अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे.

विश्वसंचार
कर्नल (नि.)
अनिल आठल्ये

समाचार म साहित्य मैफल

# महावीरांचे स्मरण करताना...

**भगवान महावीर हे अहिंसेचे मूर्त स्वरूप म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या जीवनकार्यात समाजातील विकृती दूर करण्याचा प्रयत्न केला. महावीरांना २४ वे आणि शेवटचे तीर्थंकर मानतात. भारतीय समाजात रुढ झालेल्या वाईट गोष्टींचे निर्मूलन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.  जैन धर्म अनादि असला तरी कालमानानुसार त्याचा ऱ्हास झाला, तथापि त्याचे पुनरुज्जीवन तीर्थंकरांकडून केले गेले असे जैनधर्मीय मानतात.**



प्रासंगिक

मंजिरी ढेरे

समाजाला प्रेरित करणाऱ्या, संस्कारांची शिकवण देणाऱ्या आणि प्रत्येक काळामध्ये जनांना योग्य मार्ग दाखवणाऱ्या महनीयांची गरज असते. वर्तमानाची ही गरज पूर्ण करण्यासाठी इतिहासात डोकवावे लागते, कारण जुन्या पर्वातील अनेक महनीयांनी समस्त मानवजातीला दाखवलेला मार्ग आजही अनुसरणीय ठरणारा आहे. त्यांचा उपदेश, मार्गदर्शन आजही माणसाला सन्मानपूर्वक जगण्याची आणि जगू देण्याची प्रेरणा देतात. असेच विचारधन मिळते ते भगवान महावीर यांच्या उपासनेमध्ये. म्हणूनच जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करणे महत्वाचे ठरते.

भगवान महावीर हे अहिंसेचे मूर्त स्वरूप म्हणून ओळखले जातात. इ.स.पू. ५९९ मध्ये वैशाली राज्यातील कुंडलपूर येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. वयाच्या आठव्या वर्षी त्यांना अध्यापन आणि शस्त्रास्त्रांचे ज्ञान मिळवण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले. महावीरांचे कुटुंबीय जैन तीर्थंकर पार्श्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर काही वर्षांनी त्यांनी श्रमणी दीक्षा घेतली. त्यानंतर ते बहुतांश वेळ ध्यानात मग्न राहत असत. काही दिवसांमध्येच त्यांना पूर्ण ज्ञान प्राप्त झाले. ते बारा वर्षे गप्प राहिले होते. एखाद्या हटयोगाप्रमाणे त्यांनी शरीराला खूप त्रास दिला. मात्र शेवटी त्यांनी केवलज्ञान प्राप्त केले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी लोककल्याणाचा प्रचार सुरू केला. त्यासाठी त्यांनी त्या काळी लोकांमध्ये प्रचलित असलेल्या अर्धमागधी भाषेचा आधार घेतला. इंद्रिये आणि वासनेच्या वस्तूच सुख आणि दुःख देतात, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे त्यांनी जैन धर्मात अहिंसा, सत्य, नि:स्वार्थीता, अनासक्ती किंवा ब्रह्मचर्य या मूल्यांचा समावेश केला. त्याग, संयम, प्रेम, करुणा, नम्रता आणि नैतिकता हे त्यांच्या उपदेशांचे सार आहे. त्यांनी चतुर्विध संघाची स्थापना करून समता हे जीवनाचे ध्येय असल्याचे सांगितले. बिहारमधील पावपुरी येथे इ.स.पूर्व ५२७ मध्ये वयाच्या बहात्तरव्या वर्षी त्यांचे निधन झाले. मात्र त्यांचा संपूर्ण जीवनपट आजही अनुयायांसाठी प्रेरणेचा स्त्रोत आहे.

भगवान महावीर यांनी आपल्या जीवनकार्यात समाजातील विकृती दूर करण्याचा प्रयत्न केला. लोकांना धर्मोपदेश केला. महावीरांना चोविसावे आणि शेवटचे तीर्थंकर मानतात. भारतीय समाजात रुढ झालेल्या वाईट गोष्टींचे निर्मूलन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.  जैन धर्म अनादि असला तरी कालमानानुसार त्याचा ऱ्हास झाला, तथापि तीर्थंकरांकडून त्याचे पुनरुज्जीवन केले गेले, असे जैनधर्मीय मानतात. ऐतिहासिकदृष्ट्या जैन धर्म भगवान पार्श्वनाथाने स्थापन केला असावा आणि त्याचे दोषरहित पुनरुज्जीवन भगवान महावीरांनी केले असावे, असे दिसते. आई-वडिलांनी महावीरांचे नाव वर्धमान ठेवले होते. पण त्यांची प्रसिद्धी ‘महावीर’ या नावानेच झाली. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या ठिकाणी वीरवृत्ती होती. इंद्र त्यांच्या दर्शनासाठी आला आणि दर्शन होताच त्याने त्याला ‘वीर’ म्हटले. चारणमुनींनी त्यांना ‘सन्मती’ नावाने संबोधिले होते, तर संगमदेवाने त्यांना ‘महावीर’ असे नाव दिले. त्यांना ‘ज्ञातृपुत्र’ असेही एक नाव आहे.

महावीर हे जन्मापासूनच विशेष ज्ञाती होते. एकदा एक मुनी त्यांच्या दर्शनाला आले असता, त्यांच्या शास्त्रविषयक शंका एकाएकी दूर झाल्या. वयाच्या तिसाव्या वर्षी महावीरांनी तपश्चर्येसाठी गृहत्याग केला. लोककल्याणाच्या भावनेने प्रेरित होऊनच महावीरांनी जगातल्या सर्व सुखांचा परित्याग केला आणि ऋजुकूला नदीच्या किनाऱ्यावर जृंथक या गावी बारा वर्षे कठोर तपसाधना केली. या तपसाधनेद्वारे त्यांनी आपल्या अंत:शत्रूपासून मुक्ती आणि केवळ ज्ञान या दोन गोष्टी प्राप्त करुन घेतल्या. त्यानंतर मौनपूर्वक विहाराच्या काळात ते मगध देशातील राजगृहाजवळच्या विपुठाचल पर्वतावर राहिले. तिथेच आषाढ शुक्ल पौर्णिमेच्या दिवशी इंद्रभूती नामक विद्वान ब्राह्मणाच्या अंत:करणातल्या शंका त्यांनी दूर केल्या. मग तो इंद्रभूती जिनदीक्षा घेऊन, महावीरांचा पहिला गणधर बनला. त्यानंतर महावीरांनी काशी, कोसल, पंचाल, कलिंग, कुरु जांगल, कंबोज, बाल्हिक, सिंधू, गांधार इत्यादी देशांमध्ये फिरुन लोकांना धर्माचा उपदेश केला. त्यांनी गृहस्थांना आठ तत्त्वे पाळण्याचा उपदेश केला. मांस खाऊ नका, दारु पिऊ नका, मध खाऊ नका, कोणत्याही प्राण्याला पीडा देऊ नका, असत्य बोलू नका, चोरी करु नका, आपल्या पत्नीशिवाय जगातल्या सर्व स्त्रियांना आई, बहीण किंवा मुलगी माना आणि कुटुंबाच्या पोषणासाठी आवश्यक तेवढाच धनधान्याचा संग्रह करा, याहून अधिक इच्छा करु नका हे ते आठ मूळ गुण त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी राजाला उपदेश केला. शस्त्र धारण करुन रणांगणात युद्ध करण्यासाठी आला असेल अथवा आपल्या देशाला बाधक ठरत असेल त्याच्यावरच राजांनी शस्त्र उचलावे, असे सांगितले. दीन, दु:खी आणि सद्‌विचारी पुरुषांवर शस्त्र चालवू नये, असे त्यांनी उपदेशात स्पष्ट केले. महावीरांच्या सर्व उपदेशात अहिंसेला अत्युच्च स्थान आहे. काया, वाचा आणि मन याद्वारेही अहिंसा साध्य केली पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. त्यांनी अहिंसेलाच श्रेष्ठ धर्म मानला. अहिंसेच्या खालोखाल त्यांनी आत्मविजयाला प्राधान्य दिले. बाह्यशत्रूंवर विजय मिळवणे सोपे आहे, तितका आत्मविजय सोपा नाही. तो अत्यंत कठीण आहे; पण त्याचे फलही तेवढेच मोठे आहे. आत्मविजय साध्य होणे गरजेचे आहे. बाह्यशत्रूवर विजय मिळवल्याने उत्तरोत्तर शत्रुत्व वाढत जाते. वैर आणि प्रतिवैर यांची परंपरा अखंड चालू राहते. आत्मविजयाने मात्र शत्रूच आपले मित्र बनतात. शत्रुत्व संपून जाते आणि बंधुत्व वाढीस लागते, असे महावीर सांगतात.


तत्कालीन समाजजीवनातील सर्व दुष्ट गोष्टी आणि दुष्ट प्रवृत्ती यांच्याविरुद्ध बंड उभारुन महावीरांनी श्रमण संस्थेची प्रतिष्ठापना केली. संन्यस्त वृत्ती, कुशाग्र बुद्धी, पराकोटीचा त्याग आणि स्वत:ला पटतील तीच तत्त्वे निर्भयपणे लोकांपुढे मांडण्याचे धैर्य अशा अनेक गुणविशेषांच्या बळावर महावीरांनी आपल्या धार्मिक कार्याची बैठक पक्की केली. राजापासून रंकापर्यंत सर्व वर्गातले आणि थरांतले शिष्य त्यांनी गोळा केले. त्यांनी प्रचलित जातीव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. विशिष्ट कुळात जन्म घेतल्याने कोणत्याही व्यक्तीकडे मोठेपण येत नसून उत्तम चारित्र्याने येते, हे महावीरांनी निर्भयपणे सांगितले.

महावीर हे ब्राह्मण धर्माच्या अथवा ब्राह्मण वर्गातील विविध तत्वांच्या विरोधात नसल्याचेही दिसून येते. त्यांनी आदर्श ब्राह्मणांची निंदा न करता आपल्या धर्मात समाविष्ट करुन घेतले. भगवान महावीरांचे गणधर मुख्यत: ब्राह्मणच होते. महावीर स्वत:ला ‘एक ब्राह्मण’ अशी पदवी लावून घेत असत. त्यांचा हल्ला मुख्यत: अध:पतित पुरोहित आणि त्यांचे जटिल क्रियाकांड यावर होता. अध्यात्मिक समानता उद्‌घोषित करताना त्यांनी वर्ण अथवा वर्ग यांचा अडथळा येऊ दिला नाही. त्याचप्रमाणे स्त्री-पुरुष असा भेद केला नाही. महावीरांचा जन्म चैत्र शुद्ध त्रयोदशीला झाला. त्या प्रित्यर्थ जैन समाज या दिवशी मोठा समारंभ साजरा करतात. जैन परंपरेप्रमाणे या धर्माचे पहिले तीर्थंकर ऋषभदेव आहेत. त्यांच्यानंतरच्या तीर्थंकराविषयी जैनपुराण कथांशिवाय इतरत्र माहिती मिळत नाही. शेवटच्या चारांची माहिती मिळते. नेमिनाथ हे बाविसावे तीर्थंकर होत तर पार्श्वत्तच हे तेविसावे तीर्थंकर होते.

जैन परंपरा महावीरांपूर्वी एक-दीड हजार वर्षांपासून प्रचलित होती असे दिसते. तीर्थंकरांच्या जीवन कथांवरुन या परंपरेचे केंद्र बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये असल्याचेही लक्षात येते. ईश्वरवादी संप्रदायाच्या अवतार कल्पनेपासून तीर्थंकरपदाची कल्पना बरीच वेगळी आहे. भारतीय समाजात रुढ झालेल्या वाईट गोष्टींचे निर्मूलन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह हे मानवाचे आंतरिक शत्रू आहेत. त्यावर जय मिळवता येतो, हे महावीरांनी जगाला दाखवून दिले. हिंसा न करता जगा आणि इतरांनाही जगू द्या, असा संदेश त्यांनी मानवजातीसाठी दिला. हिंसेने बरबटलेल्या वाटेवरुन चालू पाहणाऱ्या आजच्या जगाला या संदेशाची मोठी गरज आहे. हिंसा हाच धर्म मानणाऱ्या विघातक आणि दुष्ट शक्तींना भगवान महावीरांच्या या उपदेशामुळे बोध मिळाला तर आजही चित्र पालटण्यास फारसा वेळ लागणार नाही.

# माणसे वाचणारा अजरामर माणूस

**२३ एप्रिल हा विल्यम शेक्सपियर यांचा जन्मदिनही आणि मृत्यूदिनही. मात्र काहीजण मृत्यूनंतरही कामाच्या, लौकिकाच्या रुपाने जगतात. अशाच काही मोजक्या नावांमध्ये शेक्सपियर या महान नाटककाराचा समावेश होतो. हे नाव साहित्यविश्वात आजही अढळ स्थान राखून आहे. त्यांनी केवळ साहित्यकृती घडवल्या नाहीत तर म णसांची मने वाचली, माणसे वाचली. नावाला मिळालेल्या अमरत्वामागे हेच कारण आहे.**



विशेष

उर्मिला राजोपाध्ये

बरेचदा साहित्यासंदर्भातील गप्पांचा मंच काही नावांच्या उल्लेखाखेरीज सजत नाही. विल्यम शेक्सपियर हे त्यातील एक नाव. या महान साहित्यिकाचे नाव आणि त्याने निर्माण केलेले साहित्य ‘कालातीत’ या शब्दाचा खरा परिचय करुन देतात. हा महान लेखक जगभर ओळखला जातो. इतकी दशके उलटूनही आजही त्याच्या नाटकांवर, साहित्यावर आधारलेल्या नानाविध कलाकृती जगाच्या कानाकोपऱ्यातील रंगमंचांवर सादर होतात आणि रसिकांना आगळीवेगळी अनुभूती देऊन जातात. त्यामुळेच त्यांच्या जन्म आणि मृत्यूदिनाच्या निमित्ताने स्मरण करणे औचित्यपुर्ण ठरते.

वडिलांच्या आर्थिक परिस्थितीमुळे शेक्सपियर यांना शालेय शिक्षणापासून वंचित रहावे लागले होते. सहाजिकच त्यांना योग्य शिक्षण घेता आले नाही. हे त्यांच्या आयुष्यातील वाईट टप्प्याचे सुरुवातीचे दिवस होते. वडिलांच्या निधनानंतर त्यांनी मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह सुरु केला. योगायोगाने लंडनमधील एका प्रसिद्ध ड्रामा हाऊसमध्ये त्यांना नोकरी मिळाली. अर्थातच हे काम त्यांच्या प्रवृत्तीच्या विरुद्ध होते, कारण तबेल्यातील घोड्यांची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती. मात्र या नाटक कंपनीची नाटके पाहताना त्यांनाही नाटके लिहिण्याची प्रेरणा मिळाली आणि एका वेगळ्या वाटेवरचा प्रवास सुरू झाला. कामाबरोबरच ते वाचन-लेखन करू लागले. त्यांची वाचनाची आवड पाहून नाटक कंपनीमध्ये प्रसिद्ध नाटककारांच्या कलाकृतींची कॉपी करण्याचे काम त्यांच्याकडे सोपवण्यात आले. अशा रितीने आवडीचे काम मिळाल्यामुळे ते पूर्णपणे झोकून देऊन काम करू लागले. यातून त्यांना स्वतःचे नाटक लिहिण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी एक नाटक मोठ्या जिद्द आणि मेहनतीने रचले. ते वाचून ‘अर्ल ऑफ साउथॅम्प्टन’ खूप प्रभावित झाला आणि त्या नाटकात काम करण्याची प्रेरणा दिली. यातूनच शेक्सपियरने नाटकात काम केले. त्यांना खूप टाळ्या मिळाल्या. पुढे ते लेखन आणि अभिनयाच्या जगात प्रसिद्ध झाले. यानंतर मात्र त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यांची नाटके राजवाड्यातही रंगू लागली. भरपूर पैसे आणि भेटवस्तू मिळू लागल्या. त्यांचे इतर लेखन प्रकाशित झाल्यानंतर तर साहित्यविश्वात एकच खळबळ उडाली. आज जवळपास ४०० वर्षांनंतरही शेक्सपियर आपल्या कर्तृत्वाने, मेहनतीने  आणि अलौकिक प्रतिभेम ुळे जिवंत आहे. जन्म-मृत्यूची एकच तारीख असलेला हा महान साहित्यिक आजही आपले अस्तित्व राखून आहे.

शेक्सपिअरने सुमारे ३४ नाटके आणि असंख्य सॉनेट्स लिहिली. ऐतिहासिक, सामाजिक, कौटुंबिक, काल्पनिक अशी सर्व प्रकारचे कथानके त्यांच्या लेखणीतून उतरली. त्यांची पहिली काही नाटके केवळ विनोदी अंगाची होती. ‘लव्हज् लेबर्स लॉस्ट’, ‘कॉमेडी ऑफ एरर्स’, ‘टेमिंग ऑफ द श्रू’, ‘ॲज यू लाईक इट’ अशी एकापेक्षा एक सरस नाटके त्यांच्या लेखणीतून उतरली. कधी स्त्री-पुरुषांचे वेषांतर, कधी एकसारख्या चेहऱ्यांच्या जुळ्यांच्या घोटाळ्याच्या कथा, कधी त्राटिकाछाप बायकोला वठणीवर आणणारा नवरा अशी कथानके आणि व्यक्तीचित्रणे त्यात पहायला मिळाली. दुसरा टप्पा होता शोकांतिकांचा. शेक्सपिअर म्हणजे ट्रॅजेडी किंग. ‘हॅम्लेट’, ‘किंग लिअर’, ‘ऑथेल्लो’, ‘मॅकबेथ’, ‘ज्युलियस सिझर’ अशी किती तरी शोकात्मक नाटके त्यांनी लिहिली. ही नाटके जुन्या इंग्रजी भाषेत आणि पोएटिक व्हर्समध्ये लिहिलेली होती. त्यामुळे एका पानावर मूळ नाटक आणि दुसऱ्या पानावर आधुनिक गद्य इंग्रजीत त्याचे रुपांतर असायचे. पण हे आधुनिक रुपांतर पहायची गरजच लागायची नाही. जवळच्या मित्राने विश्वासघात केल्यावर ‘यू टू ब्रूटस-देन डाय सिझर’ हे ब्रूटसने अंगावर शेवटचा घाव घातल्यावर सिझरने उच्चारलेले शेवटचे वाक्य शेक्सपिअरचे माणसांची बरोबर नस पकडणे इतके कालातीत आहे की, पृथ्वीवर माणसे असेपर्यंत शेक्सपिअरच्या नाटकातले उद्‌गार सार्थ ठरणारच. त्यांनी जवळजवळ दीड-दोन हजार व्यक्तिरेखा रेखाटल्या. एका अर्थी ती सगळी जिवंत माणसे आहेत. माणूस जातो पण मानवी प्रवृत्ती राहतात. म्हणूनच शेक्सपिअर कधी जुना होत नाही.

‘ट्रॅजी कॉमेडीज’ हा शेक्सपिअरच्या नाटकांमधील महत्त्वाचा टप्पा म्हणवा लागेल. या टप्प्यातल्या चार नाटकात सर्वोत्कृष्ट म्हणजे टेम्पेस्ट. त्याचा आत्मा शोकात्म पण अंत मात्र सुखांत. अनेक टीकाकारांच्या मते, नाटककार म्हणून त्याची परिपक्वता ट्रॅजी कॉमेडीत अधिक दिसते. युध्द, खून, सूड, मारामाऱ्या, क्रौर्य, रक्तपात ही अनेक नाटकांमधील नेहमीची दृश्ये असली तरी त्या हिंदी सिनेमांप्रमाणे सनसनाटी निर्माण करणाऱ्या घटना नाहीत. त्या मागचे कार्यकारणभाव, राजकारण, नाट्यात्म वळणे यांचा एक अपरिहार्य शेवट म्हणून अशा घटनांकडे बघावे लागते. पाच अंकी लांबलचक कथानके, अनेक घटना प्रसंगातून आपल्या समोर पटकथेसारखी उलगडत जातात.

त्या काळी रंगमंचावर अत्यल्प सामग्री वापरली जात असे. बऱ्याचदा रंगवलेले पडदे अन्यथा पॅलेस, फॉरेस्ट, स्ट्रीट असे फलक अशी रचना असायची. अशा वेळी वातावरण उभे करावे लागते ते शब्दातूनच. शेक्सपिअरच्या नाटकात अनेक वेळा लांबलचक वर्णने येतात, ती कवितेसारखी सादर होतात. थोडक्यात, आजच्या तंत्रयुगात नेपथ्य किमया करते ती त्यांच्या साहित्यगुणांमधून साधली जात होती. तीन मजली अर्धगोलाकार नाट्यगृहात चार-पाचशे प्रेक्षक नाटक पहायला येत, तेव्हा त्यांच्यापर्यंत आवाज पोचवण्यासाठी त्या काळात ध्वनीवर्धक लाऊडस्पीकर नव्हते. पण नटांच्या आवाजाची फेक आणि पल्लेदार लयदार वाक्ये  केवळ कानापर्यंतच नव्हे तर मनापर्यंत सहज पोहोचत.

शेक्सपिअरच्या शोकात्म नाटकांचा अभ्यास करताना ‘कॅरॅक्टर इज डेस्टिनी’ असे म्हटले जाते. ग्रीक शोकांतिकांमधे नशिबाचे फासेच उलटे पडल्याने नायकाचा शोकात्म घडून येतो. ‘इडिपस रेक्स’ या नाटकात इडिपसच्या जन्मवेळी भविष्यवाणी उच्चारली गेली होती की, हा मुलगा आपल्या बापाला मारेल आणि आईशी विवाह करेल. असे काही तरी विपरीत घडू नये, म्हणून बापाने रानात नेऊन मारुन टाकण्याची आज्ञा दिली असतानाही इडिपस जिवंत राहतो आणि दुर्दैवाने परिस्थिती नेमकी अशी पालटत जाते की, भविष्यवाणी खरी होते. ज्या डोळ्यांनी आईशी समागम पाहिला, ते डोळे स्वत: तीक्ष्ण ब्रेसलेटने फोडून घेऊन इडिपस अंध होतो. सोफोक्लिसच्या या शोकांतिकेत नायकाचा काही दोष नाही, दोष आहे तो केवळ परिस्थितीचा, पण शेक्सपिअर आपल्या नायकांना परिस्थितीपुढे असे लाचार बनवत नाही. त्यांच्या शोकांतिकेला स्वत: त्या त्या नायकांचे स्वभावच कारणीभूत आहेत. जीवनातल्या कटू वास्तवतेला हे जास्त धरुन आहे. मॅकबेथ कालांतराने राजा झाला असता, पण परिस्थिती पालटण्याची वाट न बघता तो राज्यपद अधीरतेने जवळ आणू बघतो. स्वत:च्या घरी पाहुणा म्हणून आलेल्या डंकनचा खून करुन! त्यात लेडी मॅकबेथ त्याच्या महत्वाकांक्षेत तेल ओतते.

खून करत असली तरी ही माणसेच आहेत. अत्यंत चांगल्या स्वभावाची, उदात्त, पराक्रमी, श्रीमंत सरदार माणसे आहेत. म्हणून त्यांचा शेवट इतका चुरचुर लावतो की असे व्हायला नको होते, असे वाचताना वाटत राहते. खुनानंतर दोघेही शांत झोप हरवतात. लेडी मॅकबेथ झोपेत चालते आणि अंधारात आपले रक्ताने बरबटलेले हात रोज धूत राहते. अरेबियातून उत्तम सेंट्स आणून लावले तरी हा रक्ताचा वास जाणार नाही असे तिला वाटते. राजगादीसाठी मॅकबेथ खालच्या थराला जातो पण त्या गादीवर बसलेले राजाचे भूत त्याला नंतर चक्रावून टाकते. शेक्सपिअरच्या नाटकांचे हेच असमान्यपण आहे की दुसऱ्यांचा खून करणारी माणसे मरताना मात्र प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी आणतात. कारण मुळात ती खूनी नाहीतच. चांगल्या स्वभावातला एक कंगोरा त्यांना उदात्त शोकात्म नायक बनवतो.

हॅम्लेट तर तरुण मुलगा, पण बापाच्या खुनाचा सूड उगवण्याची कृती तो करु शकत नाही. तो फक्त विचार, विचार आणि विचार करतो. ऑथेल्लो नेमकेपणाने हेच करु शकत नाही. डोक्यात संशयाचे भूत शिरले आणि त्याने सौंदर्यवती देस्देमोनाचा गळा आवळला. शेक्सपिअरचा भाष्यकार ब्रॅडली म्हणतो, हॅम्लेट आणि ऑथेल्लो यांच्या स्वभावाची उलटापालट झाली असती तर या शोकांतिकाच घडल्या नसत्या. हे खरे आहे, पण शेवटी ‘स्वभावो दूरतिक्रम:’ त्या त्या व्यक्तीचा स्वभावच त्याच्या जीवनाचे शिल्प घडवत असते. म्हणूनच स्वत:वरील अतीप्रेम आणि माणसे ओळखण्यात अपयशी ठरलेला किंग लिअर आपल्यावर खरे प्रेम करणाऱ्या कॉर्डेलियाला ओळखू शकत नाही. अंती दोघांचाही शेवट होतो. ‘ज्युलियस सिझर’ हे नाटकाचे नाव असले तरी त्याचा खरा नायक आहे शेवटचा घाव घालणारा ब्रूटस. शेक्सपिअरने अशी माणसे वाचली आणि आपल्या साहित्यामध्ये मांडली. माणसाचा स्वभाव किती अगम्य याची जाणीव त्यांच्या नाटकांनी करुन दिली. म्हणूनच माणूस वाचणारा हा माणूस अजरामर झाला.

पान ४ वरुन

# आरोपांचा ताप, संकटात ‘आप’

चड्ढा यांचा जुना फोटो पोस्ट केला होता. केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता यांनी आपल्या पतीला तुरुंगातून ‘आप’ आमदारांना जनतेसाठी काम करत राहण्याचा संदेश दिल्याचा व्हिडिओही त्यांनी पुन्हा पोस्ट केला; पण ज्या स्वरात आणि कठोर पद्धतीने त्यांनी भाजपवर हल्ला चढवला आहे, त्या अनुषंगाने एकही धारदार ट्विट चड्ढा यांच्याकडून आले नाही. शस्त्रक्रियेनंतर त्यांच्यावर रेटिनल डिटॅचमेंट सर्जरीच्या सूचना असून उन्हात बाहेर न जाण्यास सांगण्यात आल्याने परत येण्यास उशीर होत असल्याचे त्याच्या समर्थकांचे म्हणणे आहे.

पहिल्यांदाच दिल्लीतून खासदार झालेल्या स्वाती मालीवाल याही केजरीवाल यांच्या जवळच्या नेत्या आहेत. त्यांच्या अनुपस्थितीचे परिणाम पक्षाला भोगावे लागत आहेत. मालीवाल सध्या अमेरिकेत आहेत आणि त्यांनी पक्षाला सांगितले आहे की त्यांची बहीण आजारातून बरी होत असल्याने तिथेच राहण्याची गरज आहे. मालीवाल ‘सोशल मीडिया’वर पक्ष आणि त्यांच्या नेत्यांच्या समर्थनार्थ संदेश पोस्ट करून आपले कर्तव्य बजावत आहेत. सध्याच्या राजवटीच्या हुकूम शाहीविरोधात जोरदार लढा देईन, असे त्या सांगत असल्या तरी आता नेता अटकेत असताना त्या बहिणीच्या आजारपणाचे निमित्त करून अमेरिकेत आहेत, हे कारण कुणालाही पटणारे नाही. प्रश्न असा आहे की केजरीवाल यांना अटक होऊन जवळपास तीन आठवडे होत आहेत. त्या कधी येणार आणि कधी संघर्ष करणार, हा प्रश्नच आहे. भारताचा माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग या पक्षातर्फे राज्यसभेचा खासदार झाल्यापासून आम आदमी पक्षाच्या कार्यात क्वचितच सहभागी झाला आहे. ‘सोशल मीडिया’वरील त्यांच्या अलीकडच्या बहुतेक पोस्ट्सवरून पक्षाच्या सर्वात प्रमुख नेत्याला अटक करण्यात आली आहे, याची माहिती नाही, असे जाणवत आहे. देशात सुरू असलेल्या आयपीएलबद्दल त्याच्या पोस्ट आहेत. हरभजन सिंग यांनी पंजाबचे मुख्यमंत्री आणि ‘आप’चे नेते भगवंत मान यांचे २४ मार्च रोजी मुलीच्या जन्माबद्दल अभिनंदन केले; पण केजरीवाल यांच्या अटकेबाबत काहीही लिहिलेले नाही. एवढेच नाही, तर ‘आप’च्या निदर्शनांमध्ये सहभागी होण्याबाबत त्यांनी थेट नकार दिला.

हरभजन सांगतात, या संदर्भात त्यांना कोणीही सविस्तर सांगितले नाही. वस्तुत: ते कोणाच्या तरी दबावाखाली आहेत असे मानले जाते. हरभजन सिंग यांच्या स्पष्टीकरणामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. पक्षातील कोणीही त्यांच्याशी संपर्क साधला नाही, ते स्वत: एकाकी पडले आहेत की पक्षाने मुद्दाम तसे केले आहे हे कळत नाही. अशोक कुमार मित्तल आणि दिनेश अरोरा यांची सबब समजण्यापलीकडची आहे. लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे संस्थापक अशोक मित्तल आणि ‘आप’चे आणखी काही खासदार पक्षकार्यापासून दूर आहेत. केजरीवाल यांनी मोठे केलेले खासदार अटकेचा निषेध करण्यासाठी अजिबातच पुढे येऊ नयेत, याला काय म्हणावे? पक्षप्रमुखांच्या अटकेबाबत बोलण्याचा अधिकार मला नाही, असे अशोक मित्तल थेट सांगतात. आणखी एक मनोरंजक बाब म्हणजे त्यांना पक्षाने नुकत्याच आयोजित केलेल्या आंदोलनात आमंत्रित केले नव्हते. याचा अर्थ पक्षाच्या एका प्रमुख नेत्याला अटक करण्यात आली असून आंदोलनासाठी निमंत्रणही हवे आहे. संजीव अरोरा हे पंजाबचे आणखी एक खासदार आहेत. दिल्लीत रामलीला मैदानावर केजरीवाल यांच्या अटकेच्या विरोधात निदर्शने सुरू असताना ते लुधियानामध्ये कसले पक्षकार्य करत होते, असा प्रश्न पडतो. पर्यावरण कार्यकर्ते आणि ‘आप’चे राज्यसभा खासदार सी-चेवाल हे पक्षाच्या बहुतेक निषेध सभांमध्ये दिसले नाहीत. स्वत:ला धर्माभिमानी असल्याचे सांगून ते त्यापासून दूर राहण्यामागील कारणे देतात. आणखी एक खासदार विक्रमजीत सिंह साहनीही आपल्या नेत्याच्या अटकेवर मौन बाळगून आहेत.

एकंदरीत, केजरीवाल अटकेत असताना पक्षाचे अनेक नेते दूर रहात असून भाजप तसेच अन्य विरोधकांना प्रश्न उपस्थित करण्याची संधी देत आहेत.

# भगवान महावीर : भक्तीचे प्रेरणास्थान

भगवान महावीर यांची आज जयंती. जैन धर्मात त्याला कल्याणक म्हटले जाते. अहिंसा, सत्य आदि पाच तत्वांची शिकवण देणारे महावीर केवळ जैनांमध्येच नव्हे तर जैनेतर समाजातही आदराचे व भक्तीचे प्रेरणास्थान झाले आहेत.

जीवन कोरा करकरीत पांढरा कागद आहे व कोणी त्या कागदावर शाई सांडून तो कागद खराब करत, विषय, कषाय, क्रोध अहंकार, लोभ, माया, वैर, तिरस्काराची शाई त्या कागदाला वाया घालवतात. एखादीच व्यक्ती अशी असते की, जी जीवनाच्या कागदावर दया-क्षमा-शांतीचे मधुर स्वर लिहिते प्रभूभक्तिचे सूर छेडून पूर्ण जीवन तालमय लयबद्ध जगून जगासाठी प्रेरणारूप बनते. अशा महापुरुषांचा जीवन कागद वर्षानुवर्षे झाली तरी खराब होत नाही वा नष्ट होत नाही.

असाच जीवनाचा कागद आहे प्रभू महावीरांचा, ज्यांना या भूतलावरून जाऊन २६७५ वर्षे झाली, तरी पण जैन धर्मीयांचे हे २४ तीर्थकर भगवान महावीर जनमानसात आपले आदराचे स्थान कायम ठेवून आहेत. त्रिशला माता आणि पिता सिद्धार्थ राजाच्या कुळात जन्म घेतलेले महावीर फक्त जैनांचे नाही तर इतर जैनेतर समाजाचेही झाले. कारण त्यांचे जीवन, त्यांचा उपदेश, त्यांचा संदेश सर्वांसाठी होता.

प्रभू महावीरांनी त्रिशला मातेच्या कुशीत असतानाच आईच्या वेदनेला ओळखल्या होत्या. तिथूनच महावीरांची सुख देण्याची यात्रा सुरू झाली. सृष्टीचे सर्वश्रेष्ठ व्यक्तित्व आई-वडील आहेत, ते खूश तर सर्व सृष्टी खूश, प्रभूंनी सर्वात आधी जनक जननीला खूश ठेवले ही त्यांची मातृभक्ती.

गृहस्थ धर्म सोडून परमार्थाच्या कठीण-बिकट मार्गावर अग्रेसर होताना भावाच्या मनातल्या व्यथा-वेदना महावीरांनी ओळखल्या आणि भावाच्या आज्ञेनुसार २ वर्ष थांबून नंतर भावाचा अनमोल आशीर्वाद बरोबर घेऊन मुनी बनण्यासाठी निघाले. यौवनाच्या दीप्तीमंत तेजस्वी तनाने साधुत्वाचा कठीण मार्ग ग्रहण करून त्यांनी दाखवले की, संसारात सारभूत काहीच नाही. यौवनाच्या शक्तीचा उपयोग फक्त पैसे कमवण्यासाठीच करू नका तर धर्माच्या धनाला या सशक्त बाहुंनी कमवा आणि आत्म अमृताचा स्वाद घ्या. कारण अध्यात्मासाठी, धर्मासाठी यौवनच जरूरी आहे. साधुत्व ग्रहण करू नाही शकलात तर कमीत कमी सद्‌गृहस्थ



बना. हा संकल्प भगवान महावीरांच्या जीवनातून घेण्याचा आज महत्वपूर्ण दिवस आहे.

महावीरांच्या जन्माच्या वेळी वातावरण पशूबळी आणि याज्ञीक क्रियाकांडांनी परिव्याप्त होते. भौतिक मूख कामना हेच जीवनाचे ध्येय होते, वर्णाश्रम व्यवस्थेने जनमाणसाला अनेकानेक वर्गात विभाजित केले होते. उच्च आणि नीच भावनेने मनुष्यच मनुष्याला अस्पृश्य मानत होता. या परिस्थितीचे अवलोकन महावीरांनी केले, परिस्थितीचे मूळ काय आहे,

याचे सूक्ष्म निरीक्षण करून यासर्व गोष्टींचे निराकरण करण्यासाठी त्यांनी साधना सुरू केली.

प्रभूंच्या साधनेचे सूत्र होते 'गच्छाई णाश्वत्तति अंजू', कुणाला पण आपल्यामुळे त्रास होता कामा नये. जिथे आपल्यामुळे अप्रियता निर्माण होत असेल तर तिथे थांबायचे नाही. साधना अवस्थेत पहिला संकल्प केला, मी कुणाच्या पण रागाचे-क्रोधाचे- तिरस्काराचे निमित्त बनणार नाही माझ्यामुळे कुणाला त्रास होईल अशा प्रकारचा व्यवहार मी करणार नाही.

प्रभू महावीरांच्या जीवन कथेवर एक नजर टाकली तर लक्षात येईल की कानात खिळे टोकणा-यावर पण प्रेम-पूर्ण सद्‌भाव ठेवा यावर त्यांचा भर. कुठेच क्रोधाचा अंश पण असता कामा नये. अत्यंत विकारी अशा चंडकौशिक सापाने डंख केला तरी त्या सापावर पण प्रेमाचा वर्षाव करा आणि म्हणूनच पायावर डंख केला तर रक्त नाही पण दूध निघाले. किती अद्‌भूत होती प्रभू महावीरांची साधना... सगळ्यांवर समान भाव-समान प्रेम...

साम्यवाद प्रभू महावीरांच्या जीवनात नखशिखांत होता. आजच्या जगात समविभाग, समान वितरण याची जास्त आवश्यकता आहे. कोणी लहान नाही मोठा नाही, उच्च कुळ नाही, निम्न कुळ नाही. सर्वच सारखे म्हणून चांडाळ कुळात जन्मलेला हरिकेशबल सारखा माणूस जेव्हा महावीरांना शरण येतो तेव्हा तो पण क्षुद्रत्वाच्या सीमा ओलांडून सर्वोच्च पदावर पोहचतो.

एका वेळेचा खुनी मुनी बनतो, हत्यारा हरी बनतो, चोर थोर बनतात कारण प्रभूकडे भेदभाव नव्हता जो प्रभू महावीरांकडे पोहचला. तो प्रभूच बनला, अशी सर्वोत्कृष्ट साधना होती महावीरांची.

साधना करताना कित्येकदा प्रतिकूलता-कष्ट वेदना उपसर्ग येत होते, पण प्रभू आपल्या साधना समाधी-समताभावातच रममाण होते. आपण कुणाचे कडू शब्द क्षणभर पण पचवू शकत नाही आणि प्रभूंनी कित्येकदा कठीणतम परिस्थितीला हसत हसत स्वीकारले, तनाने आणि मनाने प्रभू महावीरांचे साधना अवस्थेतील सूत्र-कडू गोळी गिळण्यासाठी असते चावन्यासाठी किंवा चोखण्याठी नाही अप्रीतिकर शब्दांना प्या आणि पचवा, प्रतिकार करू नका, प्रत्युतर देऊ नका ही त्यांची शिकवण आहे.

प्रभूंच्या नावाची ४ अक्षरे घ्या. अक्षरातच संदेश दडला आहे.

म :- मस्ती का आलम- जीवनात फार विषम प्रसंग होते पण प्रभू प्रशमभावातच आपल्या आत्म मस्तीत राहत होते . जिथे विरोध होत गेला तिथे विरोधाला विनोद समजून आनंदच घेत राहिले , जिथे प्रहार होत होते त्या प्रहाराला पुरस्कार रूपाने घेत होते. अशी आत्ममस्ती सदा सर्वदा आमच्या जीवनात पण येवो.

हा :- हार नही जीत- प्रत्येक क्षणी संघर्ष आ वासून उभाच होता, पण प्रत्येक पावलावर विजयी मिळवत राहिले. प्रभूंच्या जीवनात हार हा शब्दच नव्हता, पावलोपावली विजयाच्या राजमार्गावरच चालत राहिले आणि म्हणूनच जो प्रभू महावीरांच्या चरणी पोहचला, त्याचे नाते विजयश्री प्राप्त करण्याबरोबर जोडले जाऊ लागले.

प्रभु महावीरांचे नाव विजयाची वाटचाल

वी :- वीरत्व का जागरण-कायरांचे पराजयाशी आणि वीरांचे विजयाशी नाते असते. प्रभू महावीरांच्या साहसापुढे इंद्राने पण मस्तक टेकले. इंद्र प्रभूंना सहयोग देण्यासाठी गेले, तर प्रभुनी त्यांना परत पाठवले आपल्या वीरत्वाच्या बळावर जगज्जेता मनोविजेता बनले.

र :- रक्षक भाव- जो वीर असतो, तोच स्व आणि पर दोन्हीची सुरक्षा करू शकतो. प्रभूंनी लहानपणीच सापांपासून मुलांची रक्षा केली. दीक्षा (संन्यस्त जीवन) घेतल्यापासून षट्‌काय जीवांची रक्षा केली. ४ तीर्थाची स्थापना- साधू-साध्वी, सद्‌गृहस्थ-सद्‌गृहिणी करून हजारो-लाखो षटकाय रक्षक तयार केले. अभय दाता बनण्याचा रस्ताच तयार केला. आपल्याप्रमाणेच सर्वांना समजा आत्मवत सर्व भूतेषु, संघर्ष, कष्ट, सहन करत स्वतःची आणि शरणात, चरणात येण्याच्या प्रत्येकाची रक्षा केली. महावीरांजवळ अभय निर्भय भावाची इतकी उर्जा होती की, त्यांच्या दर्शनाने त्यांच्या वातावरणात पोहचण्याने सर्वच भयरहित बनत होते. भगवान महावीरांचे महत्वपूर्ण सिद्धांत अहिंसा, अनेकांत एवं अपरिग्रह या ३ सिद्धांतांची आज वर्तमानात फार गरज आहे .

अहिंसा- जिथे अहिंसा तिथे शांती, तिथे भयच राहत नाही, अहिंसा भाव म्हणजेच प्रेम, आणि जिथे प्रेम, तिथे कुशल क्षेम.

अनेकांत-सर्वांना समान हक्क, समान वागणूक, समान दर्जा. मी म्हणतो तेच खरे अशी अधिकारी भाषा नव्हे तर तुमचे पण म्हणणे बरोबर. सर्वांचे ऐकले, सर्वांना घेऊन चालले तर भांडणच होणार नाही घराघरात रामराज्य येईल.

अपरिग्रह-आवश्यकतेपेक्षा जास्त जवळ ठेवायचे नाही अर्जनाबरोबर विसर्जन पण करा. जिथे लालसा, तृष्णा, लोभ तिथे असंतोषाचा जन्म, पोटापुरते ठीक पण पेटी आणि पेटारा भराण्यात जन्म वाया घालवू नका . अपरिग्रह हा सिद्धांत सर्वांनी ग्रहण केला तर संसारात गरीब आणि दुःखी कोणीच राहणार नाही. महावीराचे जीवन म्हणजे एक बृहद क्रांती कथा आहे. प्रभूंनी आपल्या युगाला एकदम नवीनच परिभाषा दिली. तर चला वर्तमानात आत्मसात करूयात महावीरांच्या तत्त्वांना, सूत्रांना आपल्या जीवनाचा मंत्र बनवून व्यवस्था तंत्राला व्यवस्थित करू आणि काही ना काही संकल्प घेऊन हा उपहार, हीच श्रद्धा त्यांच्या चरणी समर्पित करू, नमन-वंदन-अभिनंदन!!!

**- आनंद उपासिका**
साध्वी विश्वदर्शनाजी

## अहमदनगर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड



**समाचार/नगर-दि.२०**

अहमदनगर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील २० विद्यार्थ्यांची हैदराबाद येथील नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.जे.बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस मुलाखत आयोजित करण्यात आली होती. रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेश टाक, मार्गदर्शक प्रा. संदीप रोहोकले, प्लेसमेंट समन्वयक प्रा.श्रुती गुंजाळ व रसायनशास्त्र विभागाच्या सर्वच प्राध्यापकांनी थेरी व प्रात्यक्षिक यांचे वेळोवेळी मार्गदर्शन करून सराव करून घेतला, त्यामुळे हैदराबाद येथील साई लाईफ सायन्स आणि इंटोनेशन रिसर्च लॅबोरेटरी या नामांकित आणि दर्जेदार कंपनीमध्ये प्रशिक्षण रसायनशास्त्रज्ञ या पदासाठी २० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. साई लाईफ सायन्समधील मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्तेच्या आधारावर निवड झाली. महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.आर.जे.बार्नबस हस्ते सत्कार करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, उपप्राचार्य डॉ. नोएल पारगे, उपप्राचार्य डॉ. प्रितम कुमार बेदरकर, विभाग प्रमुख डॉ. राजेश टाक, मार्गदर्शक प्रा. संदीप रोहोकले, प्लेसमेंट समन्वयक प्रा. श्रुती गुंजाळ आदीसह रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनसंवाद अभियानाचा आज सायंकाळी समारोप

**समाचार/नगर-दि.२०**

विकसित भारतात आपले नगर मागे न राहता त्याच वेगाने विकसीत व्हावे यासाठी सर्वसामान्य नागरिक व सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांच्या विकासाच्या नवनवीन संकल्पना व मत जाणून घेण्यासाठी विचार भारती या संस्थेच्या वतीने १४ एप्रिल पासून जन संवाद अभियान राबवले. गेल्या ६ दिवसात सुमारे २५ विविध क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधून त्यांच्या मनातील शहराचा व जिल्ह्याच्या विकासाच्या संकल्पनांचे संकलन करण्यात आले आहे. जन संवाद या अभियानाचा समारोप शनिवार दि.२० एप्रिल रोजी सायंकाळी ७:३० वाजता सावेडीच्या माउली सभागृहात होणार आहे. यावेळी तयार करण्यात आलेल्या शहर व जिल्ह्याच्या विकासाच्या बृहत् आराखड्यास अंतिम स्वरूप देण्यात येणार आहे, अशी माहिती विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी यांनी दिली.

या कार्यक्रमात प्रशासन आणि राजकीय व्यवस्थेला बरोबर घेवून सर्व नगरकरांना विकसित भारत व विकसित अहिल्यानगर यासाठी शपथ दिली जाणार आहे. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री व महसूलमंत्री राधाकृष्ण विखे व खा.डॉ.सुजय विखे यांना निमंत्रित करण्यात आले आहे. अशी माहिती विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी दिली.

## शब्दकोडे-१५

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | ■ | ६ | ७ | ८ | ९ | ■ | १० | ११ |
| १२ | | | | ■ | १३ | १४ | ■ | १५ | | | १६ | ■ | |
| | ■ | १७ | | १८ | | | १९ | | ■ | २० | | २१ | |
| २२ | २३ | ■ | २४ | | ■ | २५ | | ■ | २६ | | ■ | २७ | |
| ■ | २८ | २९ | ■ | | ■ | ३० | | | ■ | ३१ | ३२ | | ■ |
| ३३ | | | | ■ | ३४ | | | ■ | ३५ | ■ | ३६ | | ३७ |
| ■ | | ■ | ■ | ३८ | | ■ | ■ | ३९ | | | | ■ | |
| ४० | | | ४१ | | ■ | ४२ | | | | ■ | ■ | ४३ | |
| ४४ | | ■ | ४५ | | ४६ | | ■ | ■ | ४७ | ४८ | | | ■ |
| ■ | | ■ | | ■ | | ■ | ४९ | ५० | | | ■ | ५१ | ५२ |
| ५३ | | ५४ | ■ | ५५ | | ५६ | | | | ■ | ५७ | | |
| | ■ | ५८ | | | ■ | ५९ | | ■ | ■ | ६० | | ■ | |
| ६१ | | | ■ | ६२ | | | ■ | ६३ | ६४ | | | ६५ | ■ |
| | ■ | ६६ | | | ■ | ६७ | | | | ■ | ■ | ६८ | |

**आडवे शब्द**
१) सतत, अव्याहत
६) अफूचे बी
१०) शेवट, अखेर
१२) लावणी, पेरणी इत्यादी शेतीतील कामे
१३) अंत:करण
१५) ढाक्क्याचे प्रसिद्ध कापड
१७) योगायोग दाखवणारा शब्द
२०) सूट
२२) कबीराचे शेले विणणारा राघव
२४) खोटे कारण
२५) हिंदीत नवीन
२६) हद्द
२७) माराची उमटलेली खूण
२८) विविध
३०) बाळ
३१) आश्चर्य
३३) कुजके पाणी
३४) प्रेम, प्रेमचेष्टा
३६) तृण
३८) अभिप्राय
४१) विषयांतर करणे
४२) गणेशाच एक नाव
४३) चाळीस शेर
४४) मनाचा ओढा
४५) जय-पराजय
४७) प्रचार करणारा
४९) विधानसभेचा सदस्य
५१) गरीब, भिकारी
५३) *** त्याची जमीन, कुळकायदा
५५) शरीर, अंत:करण आणि द्रव्य एकत्रित
५७) सोसाट्याचा वारा
५८) पर्णवस्त्र
५९) देह
६०) स्वाक्षऱ्या
६१) मोजणारा
६२) मुदतीचा करार, वचन
६३) मुंबईजवळील एक प्रसिद्ध खाडी
६६) खोडण्याचे साधन
६७) लोणी
६८) मलई

**उभे शब्द**
१) निर्लज्ज
३) त्वेष, आवेश
४) विपत्तीची कहाणी
५) नशा आणणारा (पदार्थ)
७) वेळ
८) बत्त्याचा जोडीदार
९) एकसारखी (वाटणी)
११) चरफड, राग
१४) नजरेचा तीर
१६) मृदू आणि बारीक केस
१८) संतापी, रागीट
१९) न्याय मिळण्याची जागा
२१) चुरूचुरू, बडबड
२३) मनाच्या मर्जीप्रमाणे
२९) होडी
३२) म्हैस, वगैरे
३४) मजकुराची नक्कल
३५) देवाणघेवाण
३७) युवक, जवान
३८) सापाची एक जात
३९) साल, वर्ष
४०) फळाची फोड
४१) कोवळी फांदी
४२) गेलेले, अवस्था
४३) मध
४६) आयुष्य, पाणी
४८) कोवळे गवत, चेष्टा
४९) तोंड, मुख
५०) पुष्परस
५२) मोठी कळशी
५३) करांगुली
५५) समशेर
५६) मत देण्याची क्रिया
५७) चावट
६०) विषमच्या विरुद्ध
६३) मालक, पोशिंदा
६४) रममाण, मग्न
६५) पृथ्वी

## शब्दकोडे-१४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चि | म | ण | चा | रा | ■ | रं | भा | ■ | क | पा | र | ■ | श |
| व | न | ■ | प | ■ | खे | ■ | ना | ह | र | ■ | सा | त | व |
| चि | ■ | आ | ट | पा | ट | न | ग | र | ■ | प | त | न | ■ |
| वा | च | न | ■ | च | र | फ | ड | णे | ■ | सा | ळा | ■ | पो |
| ट | ■ | न | ग | र | ■ | र | ■ | ■ | मौ | ■ | स | प | क |
| ■ | रो | ■ | द | ■ | स | त | त | ■ | न | व | जा | त | ■ |
| न | ज | रा | न | ज | र | ■ | प | र | ■ | जा | णे | ■ | मं |
| श्व | ■ | म | ■ | र | का | ना | ■ | क | ड | बा | ■ | तं | ग |
| र | स | दा | र | ■ | री | त | ■ | म | ■ | की | र | ■ | ळ |
| ■ | मा | स | ■ | गो | ■ | ल | ■ | पा | वा | ■ | वा | न | वा |
| रा | धा | ■ | व | ■ | भा | ग | व | त | ■ | प | ळ | भ | र |
| ज | न | ग | ण | म | न | ■ | र्ण | ■ | को | ट | ■ | ■ | ■ |
| व | ■ | ज | वा | न | ■ | को | ■ | आ | प | प | र | भा | व |
| ट | स | र | ■ | न | ज | रे | आ | ड | ■ | ट | ■ | ग | र |

## आपले भविष्य

दि.२१/०४/२०२४ ते २७/०४/२०२४

**शिरीष कुलकर्णी**
मो.नं.८७८८२६६६९०

**मेष:** **हिंमतीने प्रतिकूलतेवर मात कराल.** स्वतःचे आरोग्य सांभाळलेत तर परिस्थती योग्य पद्धतीने हाताळू शकाल. धरसोड वृत्ती आणि चंचलता टाळायला हवी. क्षणिक आणि ऐहिक सुखांचे आकर्षण वाढते राहील. पौर्णिमा घरातील कर्त्या पुरुषास अनारोग्यकारक ठरेल. काही जणांना तीव्र डोकेदुखीचा त्रास होऊ शकतो. गुरुवारी जिद्दीने आणि हिम्मतीने प्रतिकूलतेवर मात कराल. सप्ताहाच्या शेवटी नैराश्याचा प्रभाव वाढवणारे प्रसंग घडण्याची शक्यता आहे.

**वृषभ:** **व्यावहारिक नुकसानीची शक्यता** मोठेपणा मिळविण्यासाठी केलेला खर्च व्यर्थ ठरण्याची शक्यता आहे. साहित्य, छोटे व्यापार, दलाली, कला, सौंदर्य,डिझाईन या आणि या सारख्या क्षेत्रात अपेक्षित प्रगती आणि मनासारखा धनलाभ होईल. पौर्णिमा डोळस गुंतवणुकीचा सल्ला देणारी आणि व्यावहारिक नुकसानीची शक्यता दर्शविणारी आहे. नोकरदारांच्या प्रयत्नांना माफक यश प्राप्ती होऊ शकते. अधिकाराच्या गैरवापराने स्वतःच्या प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही याची खबरदारी घ्या.

**मिथुन:** **सात्विकता वाढेल.** आर्थिक प्रगती मनासारखी होत राहील. साहित्य आणि कलाभिरुची कामाचे ताण हलके करेल. वित्त क्षेत्रात अपेक्षित घटना घडतील. पौर्णिमा वैचारिक ताण निर्माण करणारी असली तरी सरकारी नोकरी आणि व्यापार अशा क्षेत्रात सन्मान देणारी आणि प्रतीष्ठावृद्धी करणारी आहे. मनात कोणाबद्दल अढी न ठेवता मोकळेपणाने काम केले तर त्याची फले तुमचा उत्साह वाढवणारी असतील. सात्विकता वाढेल.

**कर्क :** **संवाद साधण्याचा प्रयत्न करा.** नोकरीत अंतर्गत मतभेद आणि राजकारण यातून वैमनस्य येणार नाही याची खबरदारी घ्या. संतुलित मनाने संवाद साधण्याचा प्रयत्न करा. हातून घडणारी धार्मिक कृत्ये मानसिक समाधान वाढवतील. पौर्णिमा अधिकार विस्तार करणारी आणि अधिकारी वर्गाला आपापल्या क्षेत्रात यशलाभ करून देणारी आहे. उत्तरार्ध कौटुंबिक जीवनांत अस्थिरता वाढवणारे प्रसंग आणणारा राहील.

**सिंह :** **अनेक क्षेत्रात अपेक्षापूर्ती होईल.** काही जणांना परदेश गमनाचे योग येतील तर काही जणांना उच्च शिक्षणात विलक्षण यश लाभेल. पौर्णिमा एककल्लीपणा आणि अहंकार वाढवणारी आहे. स्वतःच्या मनावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक जीवनात असमाधान राहील. पती पत्नीतील मतभेद तीव्र होण्याची शक्यता आहे. कौशल्याने परिस्थिती हाताळण्याची आवश्यकता आहे. उत्तरार्ध यशदाई आणि अनेक क्षेत्रात अपेक्षापूर्ती करणारा आहे.

**कन्या :** **कौटुंबिक परिस्थितीचा आढावा घ्या.** श्रेष्ठत्वाचा अहंकार आप्त जनांना दुखावण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवनात प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. पती पत्नीच्या नात्यातील अडचणी दूर कराव्या लागतील. पौर्णिमा आर्थिक खर्च वाढवून व्यावहारिक नुकसान करण्याची शक्यता आहे. सप्ताहाच्या शेवटी संतुलित मनाने कौटुंबिक परिस्थितीचा आढावा घ्या.

**तूळ :** **ऐहिक सुखांची परिपूर्णता लाभेल** सामाजिक क्षेत्रात मान वाढेल. लेखन, शिक्षण आणि साहित्य अशा क्षेत्रात अपेक्षापूर्तीचा आनंद लाभेल पौर्णिमा उत्साहाच्या भरात काही अनावश्यक कृती करायला लावून मनःस्ताप करेल. कुसंगत अविचारी कृती करायला लावू शकते. आग्रही चित्तवृत्ती वादविवाद करवतील. उत्तरार्धात ऐहिक सुखांची परिपूर्णता लाभेल तर सप्ताहाच्या शेवटी भावनिक निर्णय घेणे टाळा.

**वृश्चिक :** **क्रोधावर नियंत्रण ठेवा.** अप्रिय प्रसंग कौटुंबिक अस्थिरता वाढवतील. स्वतःच्या दैनंदिनीत नियमितपणा आला तर स्वतःचे आरोग्य टिकवून ठेवता येईल. कलेबाबत वाढती रसिकता जोपासाल. पौर्णिमा कौटुंबिक चिंता वाढवणारी असली तरी व्यावसायिक आघाडीवर प्रेरणा आणि उत्साह वाढवणारी राहील. शनी मंगळ कौटुंबिक खर्च हाताबाहेर नेऊ शकतात. कुटुंबातील सदस्यांची धुसफूस वाढेल. सप्ताहांती क्रोधावर नियंत्रण ठेवा.

**धनु :** **अपेक्षापूर्ती करणाऱ्या प्रसंगांचा काळ.** उत्साहाच्या आवेगात प्रगतीसाठी शॉर्टकट घेणे अविचारी ठरू शकते. प्रतिष्ठित आणि समाजातील मोठ्या लोकांशी मतभेद होतील. कौटुंबिक आघाडीवर सुख, आनंद आणि समाधान देणाऱ्या घटना घडतील. पौर्णिमेच्या आसपास नोकरीत आणि उद्योगात प्रतिकूल प्रसंगांचा सामना करावा लागेल. गुरुवार सन्मानकारक आणि अपेक्षापूर्ती करणाऱ्या प्रसंगांचा आहे. सप्ताहांती आराम आणि स्थैर्य लाभेल.

**मकर :** **जोखमीच्या कामात आर्थिक नुकसान** अहंकार आणि खोट्या प्रतिष्ठेच्या आहारी जाऊन आप्तेष्टांच्या सहवासाचा आनंद गमाउ नका. वैवाहिक घडामोडीत प्रगती झाल्याने विवाहेच्छू सुखावतील. अधिकारी वर्गाने सामंजस्याचे आणि तडजोडीचे धोरण ठेवल्यास नोकरीतील कामे वेळेत पूर्ण होऊ शकतात. वाढत्या खर्चासोबत वेळेची कमतरता भासेल. महत्वाच्या वस्तू आणि रोख रक्कम सांभाळा. जोखमीच्या कामात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** **कौटुंबिक घटनातून मनःस्ताप संभवतो.** आप्तेष्टांच्या आरोग्याबाबत दक्षता बाळगावी लागेल. अविचारातून धनानाशाची शक्यता आहे. दैनंदिन खरेदी करताना आर्थिक तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. नोकरदार आणि व्यापाऱ्यांना पौर्णिमा अनुकूल आहे. नव्या योजना कार्यान्वित करता येतील. स्वतःची प्रतिमा आणि प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी स्वतःची नियमावली काटेकोरपणे पाळा. उतावळेपणाने केलेल्या कृतीला अपयश येण्याची शक्यता आहे. अनपेक्षित कौटुंबिक घटनातून मनःस्ताप संभवतो.

**मीन :** **साहित्य आणि कलेचा आनंद घ्याल.** कौटुंबीक आघडीवर निर्माण झालेली प्रतिकूल परिस्थिती मानसिक गोंधळ वाढवेल. रसिकतेने साहित्य आणि कलेचा आस्वाद घ्याल. घरातील मानसिक ओढाताण करणाऱ्या प्रसंगांना तोंड द्यावे लागेल. व्यय स्थानातील शनी आणि मंगळ आरोग्य नाजूक ठेवतील. धावपळीत पायाला दुखापत होऊ नये याची काळजी घ्या. सप्ताहाच्या अंती धरसोड वृत्ती नुकसान करेल.

PDF Compressor Free Version



विहिंप, बजरंग दल आक्रमक; जिल्हा प्रशासनाला निवेदन

# कत्तलखाने बंद न केल्यास रस्त्यावर उतरु

**समाचार/नगर-दि.२०**

नगर शहर व जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने त्वरीत भुईसपाट करण्यात यावे अशी मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने करण्यात आली. या संदर्भात जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले.



महाराष्ट्रात गोवंश हत्या बंदी कायदा असतांना काही समाज कंटक त्या कायद्याची पायमल्ली करत आहे. वरील सर्व ठिकाणी पोलीस स्टेशन कडून व एल.सी.बी.च्या पथका कडून अनेकदा कायदेशीर कारवाई करण्यात आल्या आहेत.तरी ही कुठलीही सुधारणा झाली नाही. कसाई राजरोस दररोज हजारो गोवंशाची कत्तल करत आहे.त्यांना प्रशासनाची भिती वाटत नाही.हे दुर्दैव आहे. झेंडिगेट,नेवासा,श्रीरामपूर व ममदापूर सर्व ठिकाणचे कत्तलखाणे त्वरीत भुईसपाट करण्यात यावे.या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने बजरंग दल जिल्हा संयोजक कुणाल भंडारी यांनी निवेदन दिले आहे.याप्रसंगी ऋषिकेश भागवत,साहिल पवार,सनी थोरात,शिवराज पवार,ऋषिकेश जुम्मीवाले,सचिन पवार आदी बजरंग दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रशासनाने कठोर पावले उचलून कारवाई न केल्यास केली नाही.तर आम्ही न्याय देवतेकडे न्याय मागु व महाराष्ट्रातील गोरक्षक व वारकरी संप्रदाय रस्त्यावर उतरुन बजरंग दल आक्रमक भुमीका घेतील, असा इशाराही निवेदनाव्दारे देण्यात आला.



# भाऊसाहेब वाकचौरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**समाचार/नगर-दि.२०**

शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उध्दवसेनेचे उमेदवारी भाऊसाहेब वाकचौरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आदित्य ठाकरे, आमदार बाळासाहेब थोरात, आमदार शंकरराव गडाख, आमदार लहू कानडे, सुधीर तांबे, संदीप वर्पे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या सभेत ठाकरे म्हणाले, नोटाबंदीमुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. देशातील अर्थव्यवस्था कोलमडली. अनेकांचे रोजगार गेले. शेतमालाला भाव नाही, महिला सुरक्षित नाही. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत नाहीत. मोदी गॅरंटीच्या नावाखाली देशातील जनतेला फसवण्याचा प्रयोग सुरु आहे. ठाकरे सरकारने अडीच वर्षाच्या कार्यकाळात शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केली. कोरोनाकाळात लाखो जीव वाचवले. त्याची जागतिक स्तरावर नोंद घेण्यात आली. त्यामुळे ठाकरे गॅरंटीवर लोकांचा विश्वास आहे.

संमेलनाध्यक्षपदी आनंदा साळवे

# निमगाव वाघात रंगणार राज्यस्तरीय काव्य संमेलन

**समाचार/नगर-दि.२०**

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने निमगाव वाघा (ता.नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज व पुण्यश्लोणक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त राज्यस्त्तरीय पाचव्या काव्य संमेलनचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती डोंगरे संस्थेचे अध्यक्ष नाना डोंगरे यांनी दिली.



संस्थेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज व पुण्यश्लो क अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव विविध सामाजिक उपक्रमाने साजरा होणार आहे. या पार्श्व भूमीवर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या कार्यक्रमाची तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे. या काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी श्रीरामपूरचे ज्येष्ठ कवी आनंदा साळवे यांची निवड करण्यात आली. या काव्य संमेलनमध्ये जिल्ह्यातील नामवंत कवी व नवोदित कवी सहभागी होणार आहे. तर विविध क्षेत्रात निस्वार्थपणे सामाजिक योगदान देणाऱ्या व्यक्तींना छत्रपती संभाजी महाराज गौरव पुरस्कार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तृत्व सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# रासपच्या तिकिटावर निवडणूक लढणार - कोठारी

**समाचार/नगर-दि.२०**

रासापाचे जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे मी लोकसभा निवडणूक लढवण्यावर ठाम आहे. मी पक्षाचा प्रामाणिक व सामान्य कार्यकर्ता आहे. त्यामुळे पक्षाचे अध्यक्ष महादेव जाणकार यांच्याशी २१ एप्रिलला चर्चा करूनच पुढील निर्णय घेणार आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश सरचिटणीस रवींद्र कोठारी यांनी केले.

नगर दक्षिण लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रवींद्र कोठारी यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी रासपचे जिल्हाध्यक्ष विकास मासाळ, शहराध्यक्ष चिमाजी खामकर, सुनील पाखरे, अगस्ती कटारनवरे, अमोल क्षिरसागर. सतीश घोगडे, सुरेश अनारसे, नवनाथ शिंदे, सतीश तरटे, माउली वाडगे, बंडू कोथिंबीरे, नाडू खरात, मोहन गायकवाड, मच्छींद्र वायफळकर, कुंडलिक गावडे, साहिल मुनोत जय रुणवाल व जय बोरा आदी उपस्थित होते.



कोठारी म्हणाले, लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे युवा असल्यापासून काम केले आहे. १९९१ साली भाजपाचे उमेदवार राजभाऊ झरकर यांच्या निवडणुकीत मी निष्ठेने काम केले आहे. तेव्हापासून भाजपच्या खासदारकीच्या व आमदारकीच्या प्रत्येक उमेदवाराचे निष्ठेने काम केले आहे. मात्र काही तात्त्विक मुद्यांमुळे मी १०१६ साली राष्ट्रीय समाज पक्षात प्रवेश केला. गेले ९ वर्ष मी याही पक्षात निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करत आहे.

त्यामुळेच पक्षाचे अध्यक्ष महादेव जाणकार यांनी तीन महिन्यापूर्वी राज्यात सर्वप्रथम माझी नगर दक्षिण साठी उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे मी तयारी सुरु करत मतदार संघात जनस्वराज्य यात्रा काढून सर्व गावांमध्ये संपर्क अभियान राबवले. आता रासपने महायुतीला पाठिंबा दिला आहे. असे असले तरी मी निवडणूक लढवण्यावर ठाम आहे. पक्षाचे अध्यक्ष महादेव जामकर यांची २१ एप्रिलला भेट घेऊन चर्चा करणार आहे.



**नगर महानगरपालिकेच्या वतीने लोकसभा निवडणुकीसाठी शहरातील कचरा वेचक महिलांना शंभर टक्के मतदान करण्याची शपथ दिली. मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे व आपला हक्क मिळवण्यासाठी सर्वांनी मतदान करावे असे आवाहन आयुक्त डॉ.पंकज जावळे यांनी केले यावेळी अस्थपना विभाग प्रमुख मेहर लहारे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, विकास उडाणशिवे आदी उपस्थित होते.**

# सुजय विखे यांना विजयी करणे कर्तव्य - कोतकर

**समाचार/नगर-दि.२०**

महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या प्रचारार्थ केडगाव गावठाण येथे उद्योजक सचिन कोतकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रचार सभा घेण्यात आली. विखे घराण्याला सहकाराचा वारसा लाभलेला आहे. शहराच्या विकासासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात खासदार निधी उपलब्ध करून दिला असून, केडगावसाठी मोठा निधी देत विकासाची कामे केली आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत विखे त्यांना केडगाव व पंचक्रोशीतून मताधिक्याने निवडून देण्याची





जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. हेच आपलं कर्तव्य आहे, असे प्रतिपादन सचिन कोतकर यांनी केले.

याप्रसंगी जालिंदर कोतकर, मनोज कोतकर, भूषण गुंड, माजी नगरसेविका सविता कराळे, महेश गुंड, गणेश सातपुते, सुनील उमाप, सागर सातपुते, बाप्पू सातपुते, धनंजय जामगावकर, उमेश कोतकर, सचिन सरोदे, रवी तात्या कोतकर, जयदीप पवार, अशोक टेकाडे, रामदास निर्वाण, दत्तात्रय ढेरे, हेमराज पाटील, मुरलीधर पाटील, अरविंद मिसाळ, किरण पवार, उस्मान मणियार, यांसह परिसरातील महिला आणि गावठान पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राकेश खेडकर, पूजा वराडे यांचा सन्मान

**समाचार/नगर-दि.२०**

एमपीएससीमध्ये निवड होऊन पुजा वराडे हिने मोठी यशप्राप्ती केली तर राकेश खेडकर यांनी दहशतवाद विरोधी पथकात चमकदार कामगिरी केल्याने नगरचे नाव महाराष्ट्रात उंचावले, असे प्रतिपादन इंटेरियर डिझायनर पूजा पवार यांनी केले. पोलिस उपनिरिक्षक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या पुजा वराडे व दहशतवाद विरोधी पथकात उत्कृष्ट कामगिरी करणारे राकेश खेडकर यांचा पोंदे परिवार व सायंतारा ग्रुपतर्फे सन्मान करण्यात आला. यावेळी पूजा पवार, विजयकुमार पोंदे, डॉ.दत्ता पोंदे, रमेश वराडे, धनश्री खेडकर, डॉ.अस्मिता अष्टेकर, आरती खाडीलकर, झेबा शेख उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना पूजा वराडे म्हणाल्या, एमपीएससी परिक्षेत यश संपादन करताना खूप परिश्रम घेतले. आंतरराष्ट्रीय धावपटू मधील कामगिरी माझ्या यशाच्या जमेची बाजू ठरली. पोलिस दलात काम करण्याची संधी मिळाली या संधीचेसोने करुन



जनतेची सेवा करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील.राकेश खेडकर म्हणाले, मुंबई येथील दहशतवाद विरोधी पथक दाखल गुन्ह्यातील आरोपीस अटक करणे, सबळ पुरावा प्राप्त करणे, अशी जिकरीची कामे केली, त्याचा सन्मान मुंबईमध्ये झाला, या कार्याची दखल नगरच्या जनतेने घेत जो सन्मान केला तो माझे पाठबळ वाढविणारा आहे.

# हॉटेल चालकांमध्ये राडा; गुन्हा दाखल

**समाचार/नगर-दि.२०**

जागेच्या वादातून हॉटेल चालकामध्ये तुफान राडा झाल्याचा प्रकार छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील खोसपुरी शिवारात घडला आहे. याप्रकरणी दोन्ही हॉटेल चालकांनी परस्पराविरोधात फिर्याद दाखल केली आहे. संभाजीनगर महामार्गावरील खोसपुरी शिवारातील नारायण रोहिदास पवार (रा. पंढरीपूल, नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रमजान रज्ञाक शेख, अफसर रज्ञाक शेख, बाबा निजाम शेख, मोसीन मुलानी ( पुर्ण नाव माहित नाही ) सर्व ( रा. खोसपुरी, अहमदनगर) यांच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर दुसरी फिर्याद बाबा निजाम शेख (रा. खोसपुरी, अहमदनगर) यांनी दिली असून नारायण रोहिदास पवार (रा. पंढरीपूल, नगर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हे दोघेही हॉटेल चालक आहे. जागेच्या वादातून सदरचा प्रकार घडला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

भिंगार कॅम्प पोलिसांची कारवाई

# कत्तलीसाठी चाललेल्या गोवंशीय जनावराची सुटका

**समाचार/नगर-दि.२०**

कत्तलीसाठी घेऊन जात असलेल्या एका जनावराची भिंगार कॅम्प पोलिसांनी सुटका केली. चार हजार रूपये किंमतीचे एक गोवंशीय जनावर, ४ लाख ५० हजाराचा पिकअप, असा ४ लाख ५४ हजाराचा मुद्देमाल कॅम्प पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार अजय गव्हाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पिकअप (एमएच १२ एसटी १०५०) वरील चालक (नाव, पत्ता माहिती नाही) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगर– छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील छावणी कॉम्प्लेक्सच्या पार्किंगमध्ये पोलिसांनी ही कारवाई केली. सहायक पोलीस निरीक्षक योगेश राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली भिंगार कॅम्प पोलिसांचे पथक हद्दीत गस्त घालत असताना त्यांना छावणी कॉम्प्लेक्सच्या पार्किंगमध्ये एका पिकअपमध्ये गोवंशीय जनावर असल्याचे दिसून आले. पथकाने पिकअप, जनावर ताब्यात घेतले असून पिकअप चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अंमलदार गोलवड अधिक तपास करत आहेत.

भाजपा नेते विनायक देशमुख यांचा सवाल

# देशात दहा जागा लढविणारी 'तुतारी' परिवर्तन कसे करणार?


**समाचार/नगर-दि.२०**

लोकसभेत बहुमतासाठी किमान २७२ जागा आवश्यक असतात. संपुर्ण देशभरात केवळ १० जागा लढविणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (तुतारी) पक्षाचे 'परिवर्तनाचे आवाहन' म्हणजे मतदारांची दिशाभुल करण्याचा प्रकार आहे, असे मत भाजपाचे नेते विनायक देशमुख यांनी व्यक्त केले. शुक्रवारी नगरच्या गांधी मैदानात महाविकास आघाडीची प्रचार सभा झाली. व्यासपीठावर महाविकास आघाडीचे ज्येष्ठ व अनुभवी नेते होते. त्यामध्ये १० जागा लढविणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार ) गटाचे , १८ जागा लढविणाऱ्या शिवसेना (उबाठा) चे व उत्तर महाराष्ट्रात केवळ एक जागा लढविणाऱ्या काँग्रेस पक्षाचे नेते उपस्थित होते. लोकसभेच्या एकुण ५४३ जागांपैकी बहुमतासाठी २७२ जागांची आवश्यकता असते, याची या मंडळींना संपुर्ण जाणीव असताना देशात परिवर्तनासाठी आम्हाला निवडून द्या.,असे आवाहन करुन त्यांनी एक प्रकारे मतदारांची दिशाभूलच केली आहे. सध्या सुरु असलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय स्तरावर काँग्रेस पक्ष २३० जागांवर तर तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी,आप आयडिएमके असे अन्य प्रादेशिक पक्ष प्रत्येकी ३०/४० जागांवर निवडणूक लढवित असुन एकमेव भारतीय जनता पक्ष ४५० पेक्षा जास्त जागा लढवित आहे. त्यामुळे इंडि आघाडीतील पक्ष सत्तेवर येण्यासाठी नव्हे तर फक्त नरेंद्र मोदी यांना रोखण्यासाठीच निवडणूक लढवित असल्याचे स्पष्टपणे लक्षात येते. एका बाजूला नरेंद्र मोदी यांच्या रुपाने कणखर व एकमुखी नेतृत्व तर दुसरीकडे 'आपला समन्वयक ही ज्यांना लवकर निवडता आला नाही अशी विस्कळीत इंडि आघाडी,असे चित्र आहे. अशावेळी मतदारांनी प्रादेशिक पक्षांच्या भुलथापांना बळी न पडता पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या खंबीर नेतृत्वाला मतदान करावे, व पाच दहा जागा लढविणार या पक्षाला मतदान करुन आपले मत वाया घालवू नये, असे आवाहन देशमुख यांनी केले आहे.



## आर्किटेक्ट, इंजिनिअर्स संघटनेतर्फे परिसंवाद

# अपारंपरिक उर्जा साधनांचा वापर पर्यावरणास तारक - काळे



**समाचार/नगर-दि.२०**

अन्न , वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांसोबतच ऊर्जा ही आपली गरज झाली आहे. वाढती लोकसंख्या, प्रदूषण, वातावरणातील बदल यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होत असून अपारंपरिक उर्जा साधनांचा वापर पर्यावरणास तारक ठरू शकेल, असा विश्वास संचालक अमित काळे व्यक्त केला.

आर्किटेक्ट, इंजिनियर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन आणि अलर्क टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिसंवादात ते बोलत होते. पिण्याचा पाण्याचा वापर सांडपाण्यासाठी न करता त्याचे योग्य नियोजन केल्यास पाण्याचा अपव्यय टाळण्यास युरिनल्सचा कारणीभूत ठरू शकेल, असा विश्वास राजेश ढवळीकर यांनी व्यक्त केला.

डीआरडीओने तयार केलेल्या बायोडायजेस्टरची माहिती व संकल्पना डॉ गिरीश कुलकर्णी यांनी दिली. वाढत्या लोकसंख्येमुळे मैला निस्सारीकरण हा डोकेदुखीचा विषय बनला आहे. अनेक शहरात नदीनाल्यात मैलायुक्त पाणी सोडले जाते. यामुळे आरोग्य व पर्यावरण धोक्यात आले असून यावर उपाय म्हणून घरगुती ते व्यावसायिक वापराकरिता बायोडायजेस्टर हा उत्तम पर्याय ठरू शकतो. शहराचे आरोग्य सुधारण्यासाठी बायोडायजेस्टर प्रभावी साधन असून यातून निघणारे पाणी झाडांना, पिकांना देता येत असल्याने हा एक पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असो संस्थेचे अध्यक्ष रमेश कार्ले यांनी प्रास्ताविक केले यावेळी अलर्क टेक्नॉलॉजी प्रा लि या कंपनीच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. अलर्कच्या संचालिका अपूर्वा काळे यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी व सभासद वास्तुविशारद वैभव देशमुख, नंदकिशोर घोडके, मयुरेश देशमुख, बिल्डर प्रकाश जैन, रमेश छाजेड , देवेंद्र सिंग वधवा, अन्वर शेख, दादासाहेब बेरड, संतोष खांडेकर , नितीन कोरडे, प्रथमेश सोनावणे, विनोद काकडे, प्रितेश पाटोळे , एस यू खान आदी उपस्थित होते.



# भगवान महावीर जयंतीनिमित्त 'अहिंसा' चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**समाचार/नगर-दि.२०**

पूर्ण जगाला अहिंसेचा संदेश देणारे भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त नगरच्या महावीर इंटरनॅशनलच्या वतीने अहिंसा या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. २० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता राष्ट्रसंत आचार्यसम्राट आनंदऋषी महाराजांचे समाधीस्थळ आनंदधाम येथे ही स्पर्धा होणार आहे, अशी माहिती महावीर इंटरनॅशनलचे नगरचे अध्यक्ष अरुण पारख यांनी दिली.

अहिंसा चित्रकला स्पर्धे व्दारे जिओ और जिने दो हा बहुमूल्य संदेश समस्त मानवजातीला देणारे भगवान महावीर स्वामींचे विचार व आदर्श लहान बालक व समस्त समाजापर्यंत पोहचवण्याचा उद्देश आहे. अहिंसा चित्रकला स्पर्धेसाठी भगवान महावीर स्वामींचे संदेश, विचार व त्यांच्या जीवनातील एक प्रसंग या विषयांवर चित्र काढायचे आहे. या स्पर्धेत चित्र काढून रंगवण्यासाठी ४५ मिनिटांचा कालावधी असेल. ही स्पर्धा वयोगट ८ ते १५ वर्षे आणि १६ वर्षे ते खुला अशा दोन वयोगटात होणार आहे, अशी माहिती महावीर इंटरनॅशनलच्या महिला अध्यक्षा वैशाली शेटिया व युवा अध्यक्ष स्वप्नील डुंगरवाल यांनी दिली.

# राजस्थानी युवा मंचतर्फे उद्या दुचाकी रॅली

**समाचार/नगर-दि.२०**

शांततेचा संदेश देणारे भगवान महावीर यांच्या जयंती निमित्ताने सकल राजस्थानी युवा मंच रविवार दिनांक २१ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता दुचाकी रॅलीचे आयोजन केले आहे. या रॅलीत महिला, पुरुष आणि मुलांचा सहभाग असून भजन आणि भक्ती गीतांचा गजर केला जाणार आहे.

आनंद धाम, इम्पिरिअल चौक-माळीवाडा वेस-बंगाल चौकी- धरती चौक- करशेट जी रोड - रामचंद्र खुंट- डाळमंडई, चितळे रोड, दिल्ली गेट, नेप्ती चौक, आयुर्वेद कॉलेज, टिळक रोड , स्वस्तिक चौक, आनंद धाम, असा रॅलीचा मार्ग आहे.

## धार्मिक संस्था, संप्रदाय पथके सहभागी होणार

# उद्या निघणार सनातन गौरव दिंडी




**समाचार/नगर-दि.२०**

सनातन संस्थेच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर रौप्य महोत्सव साजरा करण्यात येत आहे. या रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने सनातन संस्थेच्या वतीने पुणे येथे २१ एप्रिलला सायंकाळी ५ वाजता महाराणा प्रताप उद्यान ते स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक डेक्कन अशा भव्य 'सनातन गौरव दिंडी'चे आयोजन करण्यात आले आहे. या गौरव दिंडीमध्ये ५० हून अधिक धार्मिक संस्था आणि संप्रदाय यांची पथके सहभागी होणार आहेत.

दिंडीमध्ये सहभागी होणाऱ्या संघटनांनी स्वतःचे बॅनर, पथक, पथसंचलन या माध्यमांतून उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस यांनी केले. पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या पत्रकार परिषदेला सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस, चैतन्य तागडे, हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र राज्य संघटक सुनील घनवट, अधिवक्ता मंगेश जेजुरीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सनातन गौरव दिंडी पायी निघणार असून दिंडीचा आरंभ महाराणा प्रताप उद्यान (भिकारदास मारुति मंदिर चौक, बाजीराव रस्ता) येथून होऊन बाजीराव रस्ता मार्गे लक्ष्मी रस्ता, अलका टॉकीज चौक ते स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक, डेक्कन येथे सांगता होईल. 'सनातन गौरव दिंडी'त भगवे ध्वज, पारंपारिक पोशाख, विविध पथके, विविध देवतांच्या पालख्या अशा प्रकारे दिंडीचे स्वरूप असेल, असेही आवाहन पत्रकार परिषदेत करण्यात आले.


॥ अहिंसा परमो धर्म ॥ भगवान महावीर जन्म कल्याणक के पावन अवसर पर - जैन सोशल फेडरेशन आयोजित

एक सुरमयी शाम, प्रभुभक्ति के नाम...

भक्ती संध्या

रविवार, दि. २१ एप्रिल २०२४ शाम ७.०० बजे

स्थान : आनंदधाम, धार्मिक परिक्षा बोर्ड, अहमदनगर.

२१ एप्रिल चलो आनंदधाम

भव्य शोभायात्रा कापड बाजार जैन मंदिर से सुबह ७.३० बजे निकलेगी...

सुप्रसिध्द गायिका : सृष्टि जगताप - श्रध्दा जगताप (इन्दौर)

जागा भाड्याने देणे

नगर-पुणे महामार्गावर, केडगाव येथे स्टेट बँकेसमोर रेस्टॉरंट व हॉटेलसाठी इ. उपयुक्त हायवे टच जलाराम बेकरी व जि. प. शाळेशेजारील 3000 Sq.Ft. शेड भाड्याने देणे आहे.

मोठा फ्रंट । अ‍ॅटॅचड् टॉयलेट व बाथरूम । भरपूर पार्किंगसह

संपर्क : 9422224270

विकणे आहे

चालू स्थितीतील जिम साहित्य त्वरित विकणे आहे.

- संपर्क -

9834448462

9175075992

पाहिजेत

हेल्पर - ४

१० वी पास/नापास

आकर्षक पगार

संपर्क :- 9890027068

श्री भगवान महावीर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी अभिवादन

राजा फळांचा

फळांचा राजा 'आंबा'

रसरशीत विविध जाती आंब्याच्या... उपलब्ध आहेत

फळ अढीत पप्पूशेठ पमनदास आहुजा ह्यांच्या. परंपरा, विश्वासाहर्ता, नैसर्गिकता जपल्या आहेत ६ तपांहून अधिक सेवेत असलेल्या या फळ अढीने.

या व भर उन्हाळ्यात घ्या स्वाद नैसर्गिक आंब्यांचा...

पप्पूशेठ पमनदास आहुजा (फळ अढी)

नवीपेठ, आधुनिक कुरिअरसमोर, अहमदनगर

प्रो. प्रा. जगदीश व कैलास आहुजा

संपर्क साधा मोबा. ९८९००५७३५३, ९५५२६३३९५५, ९०२८२४८९८७

एमएच-नर्सिंग सीईटी-2024

ए.एन.एम. व जी.एन.एम. नर्सिंग अभ्यासक्रम प्रवेश परिक्षा-2024

शैक्षणिक वर्ष 2024-25 च्या प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाने यंदा पासुन एमएच-नर्सिंग सीईटी-2024 आवश्यक व अनिवार्य केले आहे.

| कोर्स | कालावधी | पात्रता |
|---|---|---|
| जी.एन.एम. | 3 वर्षे | 12 वी पास व एम.एच. नर्सिंग सीईटी परिक्षा अनिवार्य |
| ए.एन.एम. | 2 वर्षे | |

शै.वर्ष. 2024-25 साठी परीक्षा प्रथम वर्ष ए.एन.एम. व जी.एन.एम. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एमएच-नर्सिंग सीईटी-2024 ही सामाईक प्रवेश परिक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. अर्ज भरण्यासाठी www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरावा.

प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दि. 25/04/2024 • प्रवेश परीक्षा दि. 08/05/2024

• प्रवेश परीक्षा संबंधी मोफत कार्यशाळा •

एमएच-नर्सिंग सीईटी ऑनलाईन नोंदणी अर्ज व परीक्षा संबंधी अधिक माहिती, मदत व मार्गदर्शनासाठी

प्रयत्न नर्सिंग कॉलेज, अहमदनगर.

पाईपलाईन रोड, गुलमोहर पोलिस चौकीजवळ, अहमदनगर-414003.

संपर्क : फोन नं. 0241-2426700/मोबाईल नं. 9850936558

SASE DCORATERS

Mandap, Light & Flower Decorators

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar

9822331006, 9579544110

Ahmednagar Merchant's Co-op.Bank Ltd., Ahmednagar

Tender for purchase of DELL Company Computers

Tenders called from the company/distributors/suppliers for purchase of Computers (CPU) as mentioned below :-

| Company Name | Details | Quantity |
|---|---|---|
| DELL | Optilplex 3000 Tower Core I3-12100 12th Gen./8GBRAM/256GB SSD Hard Disk, Win11 Pro, 3 Years Onsite Warranty | 45 |

The detail quotation for the same should be send on or before 26/04/2024 at cbs.it@amcbank.in.The quotations received after the stipulated time will not be considered.

N.K.Bhandari Jt.CEO | S.B.Puranik CEO | A.V.Mutha Vice Chairman | H.C.Munot Chairman

Milk & Cream Icecream Product

HATSUN Daily

Arun ICECREAMS

प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दिनांक - १९ एप्रिल ते २५ एप्रिल २०२४

| चित्रपट | वेळ |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 8.00 AM, 11.10 AM, 02.15 PM, 07.00 PM, 11.00 PM |
| मैदान | 8.30 AM,12.00 PM, 6.45 PM,10.15 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 03.25 PM |
| GODZILLA X KONG | 5.30 PM |
| CREW | 01.25 PM, 10.30 PM |
| राजकारण गेलं मिशीत | 04.00 PM |
| द लिगसी ऑफ जिनेश्वर | 10.00 AM, 07.40 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show | CONNPLEX | AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.

Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्टल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी

शांतीलाल डागा

दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.

फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०

UNITED PHARMA

Sargical & Generic Medicine

UNITED PHARMA

Pharmaceutical Distributors

Near Kedgaon Ves, Kedgaon

90 49 93 44 44

79 72 37 80 81

98 22 02 06 49

V-GUARD

१७ वर्षांपासून ग्राहकांच्या सेवेत

Harnessing nature for a better tomorrow.

Truhat za+pro

१० वर्ष वॉरंटी

SOLAR WATER HEATER

V-HOT PLUS SERIES

Harnessing the sun

www.vguard.in

अखंडित गरम पाण्यासाठीचा सोपा मार्ग

आदित्य एंटरप्राईजेस

गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर

मोबाईल नं. : ९३२५१०३७८१